७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
रविवार, दि. १४ जून २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# कुंभमेळ्यापूर्वी ९० टक्के कामे पूर्ण होतील

## भीमाशंकर मंदिर विकास आराखड्याची मुख्यमंत्री यांच्याकडून पाहणी : १५० घरांसाठी नवीन गाव वसवणार - फडणवीस

**पुणे (दै. संध्या)**



"बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर देवस्थानच्या परिसर विकास आणि सभामंडपाच्या जीर्णोद्धाराचे काम प्रशासनाने अत्यंत वेगाने व उच्च दर्जाचे केले आहे. पुढील वर्षी सुरू होणाऱ्या कुंभमेळ्यापूर्वी येथील ९० टक्के कामे पूर्ण केली जातील," असा ठाम विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. या भव्य विकास आराखड्यामुळे पुढील काळात भीमाशंकरला येणाऱ्या भाविकांची संख्या ५ ते १० पटीने वाढेल, असेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भीमाशंकर मंदिर विकास आराखड्याची पाहणी केली. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते.

परिसर विकासाच्या आराखड्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी मोठे सहकार्य केल्याचे मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले. या प्रकल्पासाठी जवळपास १५० घरे स्थलांतरित केली जात आहेत. या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, "आम्ही चंग बांधला आहे की, या १५० कुटुंबांना अगदी शेजारीच उत्तम जागा देऊन एक सुंदर आणि आदर्श गाव तयार केले जाईल. भीमाशंकरला येणारे भाविक या गावालाही भेट देतील, अशी व्यवस्था केली जात असून यामुळे येथील गावाची अर्थव्यवस्था पूर्णपणे बदलून जाईल."

भाविकांच्या सोयीसाठी भीमाशंकरला येण्याचा आणि जाण्याचा रस्ता वेगळा केला जात आहे, ज्यामुळे भविष्यात येथे वाहतूक कोंडी होणार नाही. तसेच, वृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुलभ प्रवासासाठी परिसरात पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहनांची सोय केली जाणार आहे. येथील स्थानिक दुकानदारांचे पुनर्वसन करून दुकाने सुव्यवस्थित मांडली जातील, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण परिसराचे सूक्ष्म नियोजन (प्लॅनिंग) करण्यात आल्याची माहिती दिली.

उज्जैनच्या महाकाल कॉरिडोअरशी तुलना सांधताना मुख्यमंत्री म्हणाले, "भीमाशंकर येथील कॉरिडोअर हा महाकालच्या धर्तीवर नाही, तर पूर्णपणे वेगळा असेल. महाकाल हे शहरात आहे, मात्र भीमाशंकर येथे समृद्ध जंगल, जैवविविधता (बायोडायव्हर्सिटी) आणि अभयारण्य (वाइल्ड लाईफ) आहे. निसर्गाला कुठेही धक्का न लावता, उलट जैवविविधतेला आणि वनविभागाला अधिक चालना कशी देता येईल, याचा विचार करून हा आराखडा तयार केला आहे.

शिवशंकराचे निवासस्थान असलेल्या या पवित्र जागेचे प्रसन्न वातावरण आणि निसर्ग अधिक सुंदर करून हा एक 'नैसर्गिक कॉरिडोअर' म्हणून विकसित केला जाईल."

### पाऊस चांगला पडावा एवढेच मागणे

या कामाचा वेग पाहता मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) आणि जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांचे मनापासून अभिनंदन केले. शेवटी, यंदा 'अलनिनो'चे वर्ष असल्याचा संदर्भ देत, "राज्यावरील पाण्याचे संकट टळावे आणि चांगला पाऊस पडावा, यासाठी भीमाशंकराचा आशीर्वाद मिळावा, एवढीच प्रार्थना आहे," असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# भारतीय हवाई दलाचं विमान आसाममध्ये कोसळलं

### जोरहाटमध्ये ५ जवानांना वीरमरण, को-पायलट बचावला

**गुवाहाटी (दै. संध्या)**



आसामच्या जोरहाट एअरबेसवर भारतीय हवाई दलाच्या विमानाचा अपघात झाला. एअरबेसवर लँडिंग करत असताना हवाई दलाचं AN-32 कार्गो विमान क्रॅश झाले आहे. या घटनेत विमानाचे दोन तुकडे झाले आहेत. या दुर्घटनेत भारतीय हवाई दलाच्या 5 जवानांना वीरमरण आलं. या घटनेत या विमानातील को पायलट बचावले आहेत मात्र त्यांना दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. भारतीय हवाई दलाकडून तातडीनं या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. भारतीय हवाई दलानं प्रसिद्धीस दिलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकात या दुर्घटनेत वीरमरण आलेल्या जवानांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. या दु:खाच्या प्रसंगात भारतीय हवाई दल तुमच्या कुटुंबासोबत उभे असल्याचं देखील सांगण्यात आलं आहे. भारतीय हवाई दलानं या घटनेचं गांभीर्य लक्षात घेता भारतीय हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी सुरु केली आहे. ही दुर्घटना कोणत्या कारणामुळं झाली याची चौकशी करण्यात येईल. जोरहाट एअरबेस जवळ विमान कशामुळं क्रॅश झालं. तांत्रिक समस्या निर्माण झाली की इंजिन फेल झालं याची चौकशी केली जाईल. याशिवाय खराब हवामानामुळं हा अपघात घडला असावा का या बाजूनं देखील चौकशी केली जाईल. भारतीय हवाई दलानं कोर्ट ऑफ इनक्वायरीचे आदेश दिले आहेत. या अपघातात को पायलट बचावला असून या चौकशीत त्याची भूमिका निर्णायक ठरणार आहे. कारण तो अपघातावेळी कॉकपिटमध्ये होता. भारतीय हवाई दलात AN-32 विमान गेल्या चार दशकांपासून महत्त्वाची भूमिका पार पाडतंय. कारगील युद्धापासून बचावकार्य राबवण्यामध्ये या विमानाची महत्त्वाची भूमिका होती.

# अजितदादांप्रमाणेच एकनाथ शिंदेंचाही घात होऊ शकतो

**सोलापूर (दै. संध्या)**



■ शिवसेना पदाधिकाऱ्याचे खळबळजनक वक्तव्य, राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी रद्द कराव्यात या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांचे पंढरपूरमध्ये सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला आता कमालीचे राजकीय वळण मिळाले आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी आणि माळशिरस तालुक्याचे पंचायत समिती सभापती दत्तात्रय मगर यांनी थेट आंदोलनस्थळी जाऊन रोहित पवारांना पाठिंबा जाहीर केला. मात्र, यावेळी बोलताना त्यांनी "अजितदादांप्रमाणेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांचाही घात होऊ शकतो," असे अत्यंत खळबळजनक वक्तव्य केल्याने महायुतीसह संपूर्ण राज्यभरात मोठी खळबळ उडाली आहे. शिंदे गटाचे अधिकृत पदाधिकारी असूनही दत्तात्रय मगर यांनी थेट आपल्याच सरकारमधील मित्रपक्षांवर संशय व्यक्त केला आहे. आंदोलनस्थळी बोलताना मगर म्हणाले, "मी सध्या सत्ताधारी सरकारमध्ये आहे, हे मान्य आहे. पण अजितदादांसोबत काय झाले, हे आज संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. शेतकऱ्यांचा एक मोठा कैवारी असणारे अजित पवार आपल्यामधून कसे हिरावले गेले, हे सर्वांनी पाहिले आहे. आता आपल्याला या दुसऱ्या कैवाऱ्याला (रोहित पवार) जपायचे आहे. मला सर्वात मोठी खंत वाटते ती म्हणजे आपले नेते एकनाथ शिंदे साहेबांची! अजितदादा जसे गेले, तसेच शिंदे साहेबांचाही अंतर्गत राजकीय घातपात केला जाऊ शकतो, अशी दाट शक्यता मला वाटतेय." सत्ताधारी पक्षाच्या एका जबाबदार पदाधिकाऱ्याने उपमुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेबाबत आणि राजकीय भविष्याबद्दल थेट जाहीर मंचावरून अशी शंका उपस्थित केल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

# त्या दिवशी 'ऑपरेशन टायगर' पूर्ण होणार : प्रतापराव जाधव

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या 'ऑपरेशन टायगर'ची जोरदार चर्चा सुरू आहे. शिवसेना ठाकरे गटाचे काही खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा वारंवार पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर आता शिवसेनेचे नेते तथा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी एक मोठा दावा केला आहे. "ऑपरेशन टायगर आता अंतिम टप्प्यात पोहोचले असून ते पूर्णत्वाकडे गेले आहे. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब ज्या दिवशी योग्य वेळ आणि मुहूर्त ठरवतील, त्या दिवशी हे ऑपरेशन पूर्ण होईल," अशी माहिती प्रतापराव जाधव यांनी दिली आहे. त्यांच्या या विधानामुळे ठाकरे गटात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील सुनेगाव येथे एका हर्बल फार्मा कंपनीच्या उद्घाटन सोहळ्यासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी हा दावा केला आहे. जाधव पुढे म्हणाले की, "या ऑपरेशनबाबत स्वतः 'उबाठा'चे नेते आणि माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अप्रत्यक्षपणे कबुली दिली आहे. त्यामुळे आता आम्हाला यावर अधिक काही बोलण्याची आवश्यकता राहिलेली नाही," असे देखील त्यांनी म्हटले आहे. वास्तविक, अंबादास दानवे यांनी याबाबत बोलताना म्हटले होते की, "काही लोक संपर्कात आहेत, तर काही उघड उघड बोलतात. आम्हाला सर्व माहीत आहे. लोकसभा निवडणुकीपासून महिना-दोन महिन्याला संपर्कात असल्याची चर्चा होते. आता हे अधिकृत मान्य करायला हवं." दानवे यांच्या याच विधानाचा संदर्भ देत प्रतापराव जाधवांनी ठाकरे गटाला घेरले आहे. दुसरीकडे, अंबादास दानवे यांच्या विधानानंतर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र शब्दांत पलटवार केला आहे. "ही महाराष्ट्रातील विकृती आहे, त्यांनी कळस गाठला आहे. महाराष्ट्र यांनी नासवला असून योग्य वेळी महाराष्ट्रातील जनता या विरोधात बंड करणार," असे राऊत म्हणाले. तसेच 'ऑपरेशन टायगर'ची भाषा करणाऱ्यांचे अमित शाह यांनी कितीवेळा ऑपरेशन केले, असा टोलाही त्यांनी लगावला.

संजय राऊत यांच्यावर त्यांनी बोचरी टीका केली. "संजय राऊत यांना कुणी विचारत नाही, त्यांना राज्यसभेची उमेदवारी मिळेल की नाही ते देखील माहित नाही. ते स्वतः काँग्रेसच्या वाटेवर आहेत" असा ज्योती वाघमारे यांनी दावा केला. संजय राऊत शिवसेना सोडणार आणि काँग्रेसमध्ये जाणार यावर कोणालाही विश्वास बसणार नाही. "आमचा हिंदुत्वाचा पक्ष आहे. राऊतांच्या पक्षाने हिंदुत्व सोडलय. काँग्रेस सोबत सलगी केली आहे" असं ज्योती वाघमारे म्हणाल्या. सध्या राज्यात गाजत असलेल्या प्रणित मोरे वादावरही त्यांनी भाष्य केलं. "हे सर्व मर्यादा ओलांडणारे प्रकार आहेत. यापूर्वीही एका व्यक्तीने आपल्या आई-वडिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. या विषयावर मी येत्या अधिवेशनात प्रस्ताव आणणार आहे. आम्ही या प्रकाराचा निषेध करतो. यात महिलांचाही समावेश आहे.घाणेरडी आणि गलिच्छ वक्तव्ये करायची आणि नंतर माफी मागायची, अशी पद्धत काही जणांनी सुरू केली आहे. अशा प्रकारचे शो आयोजित केले जात आहेत" असं त्या म्हणाल्या.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## विठुरायाच्या मूर्तीवर होणार विशेष संवर्धन प्रक्रिया

# २३-२४ जून विठ्ठल मंदिर दर्शनासाठी पूर्णपणे बंद



**पंढरपूर (दै. संध्या)**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पंढरपूरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर 23 आणि 24 जून रोजी सर्व प्रकारच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. विठ्ठलाच्या मूर्तीची झीज रोखण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून विशेष संवर्धन आणि लेपन प्रक्रिया करण्यात येणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. मंदिर प्रशासनाने देशभरातील वारकरी, भाविक आणि पर्यटकांना या दोन दिवसांत पंढरपूरला दर्शनासाठी येऊ नये, असे आवाहन केले आहे. श्री विठ्ठलाच्या मूर्तीची नैसर्गिक झीज वाढत असल्याचे निरीक्षण समोर आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर समिती, वारकरी प्रतिनिधी आणि पुरातत्त्व विभागाची बैठक झाली होती. या बैठकीत मूर्तीचे पारंपरिक की रासायनिक पद्धतीने संवर्धन करायचे यावर सविस्तर चर्चा झाली. अखेरीस तज्ज्ञांच्या शिफारशींनुसार 22 ते 24 जूनदरम्यान रासायनिक पद्धतीने मूर्तीवर संरक्षक लेपन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. माहितीनुसार, विठ्ठलाच्या मूर्तीच्या पायाजवळ झीज होऊन खड्ड्यासारखा भाग निर्माण झाला आहे. तसेच इतर काही भागांमध्येही झीज झाल्याचे निदर्शनास आले आहे. यासाठी मूर्तीच्या मूळ दगडाशी सुसंगत दगडी पावडर आणि विशेष सेंद्रिय रसायनांचा वापर करून झिजलेल्या भागांची दुरुस्ती केली जाणार आहे. यासोबतच मूर्तीचे आयुष्यमान वाढावे यासाठी संरक्षक आवरण देखील दिले जाणार आहे. या संवर्धन प्रक्रियेदरम्यान मूर्तीच्या सुरक्षिततेसाठी आणि तांत्रिक काम निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी: 23 जून – मंदिर दर्शनासाठी बंद 24 जून – मंदिर दर्शनासाठी बंद या दोन्ही दिवसांत कोणत्याही प्रकारचे सर्वसामान्य दर्शन उपलब्ध असणार नाही. संपूर्ण संवर्धन प्रक्रिया भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग (ASI), राज्य पुरातत्त्व विभाग आणि मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. मंदिर प्रशासनाच्या मते, विठ्ठलाच्या मूर्तीचे पावित्र्य कायम राखत वैज्ञानिक पद्धतीने संवर्धन करणे हा या प्रक्रियेचा मुख्य उद्देश आहे. विठ्ठलाच्या मूर्तीचे यापूर्वीही वेळोवेळी संवर्धन करण्यात आले आहे.

सन 1988, 2005, 2012, 2020 या चार टप्प्यांमध्ये मूर्तीवर लेपन आणि संरक्षणाची कामे झाली होती. आता जवळपास पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा संवर्धनाची आवश्यकता निर्माण झाल्याने ही प्रक्रिया राबवली जात आहे.

### वारीपूर्वी भाविकांसाठी महत्त्वाचे आवाहन

आषाढी वारीसाठी राज्यासह देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होणार आहेत. त्याआधी मूर्तीचे संवर्धन पूर्ण व्हावे आणि दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवता यावी यासाठी मंदिर प्रशासनाने 23 व 24 जून रोजी पंढरपूरला येण्याचे नियोजन टाळावे, असे स्पष्ट आवाहन केले आहे. विठुरायाच्या मूर्तीचे जतन आणि भावी पिढ्यांसाठी तिचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# पुण्यात शिकलेले धीरज सेठ नवे लष्करप्रमुख

## संरक्षण मंत्रालयाकडून आदेश जारी, देशसेवेत मोठी जबाबदारी



**नवी दिल्ली (दै. संध्या)**

केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी मोठी जबाबदारी दिली असून आर्मी प्रमुख पदासाठी त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढले आहेत. पीव्हीएसएम, यूवायएसएम, एव्हीएसएम आणि सध्या आर्मी स्टाफचे उपप्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या धीरज सेठ यांना पुढील आर्मी स्टाफ प्रमुख म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. 30 जून 2026 च्या दुपारपासून ही नियुक्ती प्रभावीपणे लागू केली जाईल. सध्याचे आर्मी स्टाफ प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी हे याच दिवशी सेवानिवृत्त होत आहेत, त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर लष्करप्रमुख पदावर धीरज सेठ कार्यभार सांभाळणार आहेत.

लेफ्टनंट जनरल धीरज सेठ हे पुण्याच्या खडकवासला येथील नॅशनल डिफेन्स अॅकॅडमीचे माजी विद्यार्थी आहेत. डिसेंबर 1986 मध्ये त्यांना आर्मर्ड कोरमध्ये प्रमोशन देण्यात आले. सुमारे चार दशकांच्या विशिष्ट सैन्य कारकिर्दीत त्यांना ऑपरेशनल, स्ट्रॅटेजिक, क्षमता विकास आणि संस्थात्मक क्षेत्रांमध्ये व्यापक अनुभव आहे. भारतीय सेनेच्या युद्धक्षमता वाढवणे आणि दीर्घकालीन परिवर्तनात त्यांचा मोठा वाटा आहे. या जनरल अधिकाऱ्याने विविध ऑपरेशनल वातावरणात प्रत्येक स्तरावर कमांड केली आहे. त्यांच्या कमांड पदांमध्ये वाळवंटी क्षेत्रातील एक आर्मर्ड रेजिमेंट, वेस्टर्न थिएटरमधील एक आर्मर्ड ब्रिगेड आणि जम्मू-काश्मीरमधील एक काउंटर-इन्सर्जन्सी फोर्स यांचा समावेश आहे. लेफ्टनंट जनरल म्हणून त्यांनी सुदर्शन चक्र कोरची कमांड केली, जी भारतीय सेनेची एक प्रमुख स्ट्राइक फॉर्मेशन आहे. त्यानंतर ते दिल्ली एरियाचे जनरल ऑफिसर कमांडिंग म्हणून कार्यरत होते, जिथे त्यांनी महत्त्वाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सैन्य सहकार्य तसेच औपचारिक जबाबदाऱ्या सांभाळल्या. आर्मी कमांडर पदावर त्यांनी साउथ वेस्टर्न कमांड आणि सदर्न कमांड यांची कमांड केली. दोन ऑपरेशनल आर्मी कमांड्सची कमांड करण्याचा दुर्मिळ बहुमान त्यांना मिळाला आहे. त्यांनी अनेक महत्त्वाच्या स्ट्रॅटेजिक पदांवर काम केले आहे, ज्याने ऑपरेशनल प्लॅनिंग, फोर्स मॅनेजमेंट आणि क्षमता विकासावर लक्षणीय प्रभाव टाकला आहे. फोर्स आधुनिकीकरणातील योगदानाबद्दल व्यापकपणे ओळखले जाणारे जनरल अधिकारी, आर्मी हेडक्वार्टर्सच्या स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग आणि क्षमता विकास विभागातील महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. त्यामुळे सेनेच्या आधुनिकीकरणाच्या दिशा, क्षमता रोडमॅप आणि दीर्घकालीन फोर्स स्ट्रक्चरिंग उपक्रमांना आकार मिळाला. भविष्यातील युद्धभूमीच्या गरजा आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान यांचा सुसंगत समन्वय साधण्यात त्यांचे योगदान मोलाचे आहे.

### सैन्य शिक्षणात उत्कृष्ट कामगिरी

लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी सैन्य शिक्षणात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे आणि विविध कोर्सेसमध्ये अव्वल स्थान मिळवले आहे. ते हायर कमांड कोर्स आणि नॅशनल डिफेन्स कॉलेजचे पदवीधर आहेत. तसेच पॅरिसमधील प्रतिष्ठित कमांड अॅण्ड स्टाफ कोर्सला उपस्थित राहिले आहेत. यातून त्यांचा व्यापक स्ट्रॅटेजिक दृष्टिकोन आणि समकालीन सैन्य व्यवहारांची जाणीव दिसून येते.

# संपादकीय

# घरापर्यंत पोहोचण्याचं युद्ध ती एकटीनं लढणार आणि जिंकणार आहे...

पिंगट सोनेरी रंगात न्हालेलं मोकळं गवताळ कुरण, निळं आकाश, एक जुनं लाकडी घर, खालच्या कोपऱ्यात छान हलक्या गुलाबी रंगाचा पोशाख घातलेली पाठमोरी तरुण मुलगी गवतावर कोपर टेकवून विसावलेली, घराकडे पाहते आहे.

ॲन्ड्र्यू वायेथने १९४८ साली काढलेल्या 'क्रिस्टिनाज वर्ल्ड' या वास्तववादी चित्रातलं दृश्य पाहताना आपल्या मनात एक सोपी गोष्ट रचली जाते. आपापल्या वयाच्या, अनुभवाच्या वळणावर उभं राहून आपण त्यात अर्थ भरतो. परंतु चित्रातल्या गोष्टीचीही एक गोष्ट आहे. जराशी गहन. ती चित्रकाराच्या मनातली, चित्रातल्या व्यक्तीचीही आहे. कोण आहे ही मुलगी? ती काय करते आहे? घर कुणाचं आहे? ती तिकडे का बघते आहे? अशा काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे मिळाल्यावर चित्र सोपं, वास्तववादी राहात नाही, ते प्रतीकात्मक बनतं. चित्राची रचना, रंग, प्रत्येक घटक काही वेगळं सांगू, सुचवू लागतात. चित्रातलं घर वायेथचं स्वत:चं.

कुरणावर विसावलेली तरुणी काल्पनिक नाही. क्रिस्टिना ओल्सन ही वायेथची शेजारीण. स्नायू दुबळे होत जाण्याचा असाध्य विकार तिला होता. चाकांची खुर्ची तिला वापरायची नव्हती. खांदे आणि कोपरांचा वापर करून जिथे सरपटत जाणं शक्य आहे तिथेच ती जाऊ शकत होती. त्यामुळे कुरण हेच तिचं जग. एक दिवस शेतातली भाजी खुडून ती घराकडे परतायचा प्रयत्न करत होती. घराच्या वरच्या मजल्यावरच्या आपल्या स्टुडिओच्या खिडकीतून वायेथने तिला बघितलं. तसा तो अनेक वर्षं बघत होता. पण यावेळी त्याला त्या दृश्यातली गोष्ट सापडली. अंतर खूप जास्त आहे. तिच्याकरता घरापर्यंत पोहोचणं कष्टप्रद आहे, ती खूप थकली आहे. पण ती पोहोचणार आहेच. तसा निग्रह, जिद्द तिच्या देहबोलीत आहे. वायेथने नेमका क्षण चित्रात पकडला. चित्राची रचना, रंगसंगती, पोत, मूड हे सर्व खूप विचारांती त्याने निश्चित केलं. रंगवण्याकरता टेंपेरा हे मध्ययुगीन तंत्र वापरलं. आसमंतात एकमेव जिवंत हालचाल क्रिस्टिनाचीच आहे. तिच्या दुबळ्या हातांची ठेवण, पाठीचा पुढे झुकलेला बाक, केसांचं विस्कटलेपण, गवताचं प्रत्येक पातं वेगळं उठून दिसणाऱ्या रखरखीत कुरणाचा अविश्वसनीय विस्तार आणि यांच्या विरोधात तिच्या खंबीर वृत्तीचा निदर्शक आहे पोषाखाचा प्रसन्न गुलाबी रंग.

हातांचे पुढे सरकणारे पंजे, तिची नजर, शरीराची रेषा थेट वर घराकडे बघणारी आहे, राखाडी आकाशाच्या पार्श्वभूमीवर ठळक दिसणारं वरच्या कोपऱ्यातलं घर, तिरप्या रेषेत तळाला क्रिस्टिना यामुळे तयार झालेली भौमितिक रचनाही अर्थपूर्ण. तिची जिद्द आणि इच्छा त्यातून व्यक्त होते. तिच्या मदतीला आसपास कोणी नाही, तिला ती अपेक्षाही नाही. घरापर्यंत पोहोचण्याचं युद्ध ती एकटी लढणार आणि जिंकणार आहे. आपल्याही मनात त्याबद्दल जराही शंका उरत नाही. सोपी रचना, कमीत कमी रंग आणि तपशील वापरून वायेथने रंगवलेलं हे निग्रही आख्यान. अमेरिकेत पोलोकचा ॲबस्ट्रॅक्ट एक्स्प्रेशनिझम लोकप्रियतेच्या शिखरावर असताना त्याने हे



वास्तववादी चित्र रंगवलं. प्रेक्षकांनी उदंड स्वागत केलं. क्रिस्टिनाचं हे जग अमेरिकन कला-इतिहासातलं भावनिक आयकॉन आहे. असंख्य सिनेमा, मालिका, कादंबऱ्यांमध्ये ते पुनरावृत्त झालं. न्यूयॉर्कच्या म्युझियम ऑफ मॉडर्न आर्टमध्ये ते बघायला मिळेल.

## संस्कृत सुभाषित

हंस: श्वेतो बक: श्वेत: को भेदो बकहंसयो:।
नीरक्षीरविवेके तु हंसो हंसो बको बक:।।

अर्थ – हंसही शुभ्र आणि बगळाही शुभ्रच. पण हंस आणि बगळा यात फरक तो काय? पाणी आणि दूध वेगळे करताना हंस आणि बगळा यांच्यातील भेद आपोआप समजतो.

## गुरु वचन

### दृढ संकल्पात सर्व शक्य

आध्यात्मिक, मानसिक, शारीरिक व सामाजिक असे विकासाचे चार प्रकार आहेत. निरंतर आध्यात्मिकतेकडे अग्रेसर राहण्यातच मानव–जीवनाची सार्थकता आहे. यासाठी मानवी मनोवृत्तीचे निर्मलीकरण व दिव्यीकरण आवश्यक आहे. सतत उपासनेमुळेच हे शक्य आहे. उपासनामुळे आत्मबळ मिळते. दैवी दयाचा अनुभव उपासनानेच होतो. उपासनाचे २ प्रकार मानले गेले आहेत –वैधी तथा नामरूप स्मरणात्मक. वैधी उपासना दुष्कर आहे. ती जटील विधि–विधानांच्या मालिकेत अडकली आहे. याउलट नामरूप स्मरणात्मक उपासना कुठलीही औपचारिकताची अपेक्षा किंवा नियम–उपनियमाने बांधिल नाही. याद्वारे सुख व दु:ख, दोन्ही एकरुप होण्याची शक्ती मिळते, हृदय शांत होते, मनाला आराम मिळतो, बुद्धीचे तेज वाढते व अंत:करण स्वच्छ होते. नामस्मरणाने साधक सौरमंडळ भेदून ब्रह्मांडाचा अधिकारी बनतो म्हणून कबीर म्हणतात की, जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंत निर्भय होऊन ईश्वराचे नामस्मरण करत राहिले पाहिजे. तेलाप्रमाणे आयुष्य संपल्यावर शरीर रूपी ज्योत बिझते. साधना व साध्य दोन वेगवेळ्या वस्तू नाहीत. त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. एकाच्या अभावात दुसरे मिळू शकत नाही. लक्ष्य विदित झाल्यावरच साधनाचे स्वरूप निर्धारित होऊ शकते. शास्त्र सांगते की, जर तुम्हाला देवत्व मिळाले तर पुन्हा या जगात येऊ शकणार नाही. जिज्ञासुच्या रुपात आपली बुद्धीमत्ता यातच आहे की, प्रथम सर्व इंद्रियांना मनात निरुद्ध करावे, मनाल ज्ञान–स्वरूप बुद्धीत विलीन करावे, ज्ञानस्वरूप बुद्धीला महान आत्म्यात विलीन करावे व यास शांत स्वरूप परमात्म्यात विलीन करावे. दृढ संकल्पानेच हे शक्य आहे. जेव्हा संकल्प दृढ असतो, ईश्वर चरणी अखंड विश्वास असतो तेव्हा उद्देश साध्य होतो. संकल्प शुद्धी व दृढतेने ईश्वरास सुद्धा तासनतास नाचवले आहे. वास्तवात दृढ संकल्प एका गडाप्रमाणे आहे, जो भयंकर प्रलोभनांपासून आपणास वाचवतो.

## उपदेशकथा

### श्रद्धेचं फळ

सुप्रसिद्ध निर्माता–दिग्दर्शक मेहबूब खान 'मदर इंडिया'ची निर्मिती करीत होते तेव्हा त्यांच्यावर बऱ्याच संकटाचा वर्षाव झाला. त्यांची स्वत:ची तब्येत बिघडली. चित्रपटाचं बजेटही वाढलं. वितरकांशी पूर्वी त्यांनी कधी लेखी करार केले नव्हते. केवळ विश्वासावर व्यवहार केले होते. चित्रपटाची किंमत वाढवली नव्हती पण खर्चाचं पारडं जड झालेलं होतं. मेहबूब खाननं पैशाच्या पूर्ततेसाठी आपली सर्व मालमत्ता गहाण टाकली. स्टुडिओ तारण ठेवून पैसे उभे केले आणि निष्ठापूर्वक चित्रपटाचं काम पूर्ण केलं. मेहबूब खान यांची कामावर आणि परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा होती. ठरल्याप्रमाणे मेहबूब खान चित्रपटाच्या निगेटिव्हज घेऊन पवित्र मक्केच्या यात्रेला गेले व तेथून लंडनला जाऊन चित्रपटावरच्या रासायनिक प्रक्रिया पूर्ण केल्या. ढासळणाऱ्या तब्येतीकडे आणि गुंतवलेल्या पैशाकडे दुर्लक्ष करून श्रद्धेने काम पूर्ण केलं. १९५८ मध्ये 'मदर इंडिया' प्रदर्शित झाला आणि एकट्या महाराष्ट्राला पंचवीस लाख मनोरंजन करपरतीमुळं मिळाले. महाराष्ट्र सरकारनं करमणूक कर माफ केला होता आणि उत्पन्नाचे विक्रम मोडले गेले होते.

कथा उपदेश : प्रत्यक्ष कामावर निष्ठा आणि परमेश्वरावर श्रद्धा असेल तर यश नक्की मिळते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:रोहिणी २२:१३:४२ |
| १४ जून २०२६ | योग:धृति १३:१४:४४ |
| रविवार | करण:शकुनि १२:१९:५९ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:चतुष्पाद |
| अधिक ज्येष्ठशके | २२:२२:१५ |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:वृषभ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४७ |
| मास–अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – २८ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:चतुर्दशी १२:१९:५९ | दर्श अमावास्या |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 9 | | 3 | 4 | | |
| | 8 | 6 | 1 | | 4 | | 7 | 9 |
| 9 | | | | | | 1 | 2 | |
| | | | 7 | 8 | 6 | | | 2 |
| | | 3 | | | | 7 | | |
| 4 | | | 2 | 3 | 5 | | | |
| | 4 | 1 | | | | | | 7 |
| 5 | 7 | | 6 | | 8 | 2 | 3 | |
| | | 8 | 5 | | 1 | 6 | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९७९ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | 2 | 8 | 1 | 5 | 3 | 6 | 9 |
| 9 | 5 | 3 | 2 | 6 | 4 | 7 | 8 | 1 |
| 1 | 6 | 8 | 3 | 7 | 9 | 2 | 4 | 5 |
| 7 | 1 | 5 | 4 | 8 | 3 | 6 | 9 | 2 |
| 8 | 2 | 4 | 9 | 5 | 6 | 1 | 7 | 3 |
| 3 | 9 | 6 | 1 | 2 | 7 | 4 | 5 | 8 |
| 6 | 3 | 7 | 5 | 9 | 1 | 8 | 2 | 4 |
| 2 | 4 | 9 | 7 | 3 | 8 | 5 | 1 | 6 |
| 5 | 8 | 1 | 6 | 4 | 2 | 9 | 3 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७५५ – डॉ. जॉन्सन यांच्या डिक्शनरी ऑफ इंग्लिश लँग्वेजचे दोन्ही खंड विक्रीस उपलब्ध झाले.
- १९८२ – फॉकलंड बेटे परत ब्रिटिश सैन्याने जिंकून घेतली आणि हा लढा संपला.

### राष्ट्रीय

- १८९६ – महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुढाकाराने पुण्यात अनाथ बालकिाश्रमाची स्थापना.
- २००६ – जागतिक पर्यावरण फाऊंडेशनतर्फे दिला जाणारा मानाचा गोल्डन पिकॉक एनव्हायरमेन्ट मॅनेजमेन्ट स्पेशल कमेन्डेशन ॲवॉर्ड कोका कोला या शीतपेय कंपनीला देण्यात आला.

### जन्म

- १९२९ – ॲलन डेव्हिडसन या डावखुऱ्या अष्टपैलू ऑस्ट्रेलियन खेळाडूचा जन्म. तो सर्वश्रेष्ठ डावखुरा गोलंदाज मानला जातो.
- १९३६ – साहित्यिक उषा मेहता यांचा जन्म.
- १९६८ – राज ठाकरे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष.
- १९६९ – प्रसिद्ध जर्मन टेनिस खेळाडू स्टेफी ग्राफ हिचा जन्म.

### निधन

- १९१६ – गोविंद बल्लाळ देवल, मराठी नाटककार नाट्यदिग्दर्शकाचे निधन.
- १९२७ – 'थ्री मेन इन अ बोट' चा लेखक जेरोम के. जेरोमचे निधन.
- १९८९ – सुहासिनी मुळगावकर, मराठी अभिनेत्री व संस्कृत पंडित हिचे निधन.
- २००३ – देव आनंद ज्याच्या शैलीची नक्कल करायचा प्रयत्न करीत असे, त्या ग्रेगरी पेक या हॉलीवूडच्या एके काळच्या तगड्या नायकाचा वृद्धापकाळाने मृत्यू. 'रोमन हॉलिडे, गन्स ऑफ नॅव्हरोन, मॅकेन्नाज गोल्ड हे त्याचे चित्रपट खूप गाजले.

## : SMS :

SEHWAGs SON: Mummy mummy !! Dekho papa Six pe Six maar rahe hain.
SEHWAGs WIFE: Beta theek se dekho, Advertisement hoga

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४०.५ | २६.१ |
| अहमदनगर | ३९.३ | २५.३ |
| अकोला | ४५.९ | ३२.१ |
| अमरावती | ४४.८ | ३२.१ |
| बीड | ४७.७ | ३५.५ |
| भंडारा | ४५.८ | ३२.१ |
| बुलढाणा | ३५.५ | २४.८ |
| चंद्रपूर | ४७.२ | ३४.९ |
| चेन्नई | ४२.५ | ३३.५ |
| नवी दिल्ली | ३६.८ | २५.७ |
| धुळे | ४५ | ३०.४ |
| गोंदिया | ४५.३ | ३२.७ |
| जळगाव | ४५ | ३०.४ |
| कोल्हापूर | ३६.२ | २४.९ |
| लातूर | ४० | २६.२ |
| मुंबई | ४३.१ | ३८.२ |
| नागपूर | ४५.९ | ३०.४ |
| नांदेड | ४३.१ | ३०.४ |
| नंदूरबार | ४१ | २७ |
| नाशिक | ३८.६ | २६.१ |
| पुणे | ३४.८ | २४.५ |
| पंढरपूर | ४०.८ | २६.३ |
| सातारा | ३७.३ | २४.१ |
| सांगली | ३८.१ | २५ |
| सोलापूर | ४०.४ | २६.६ |
| वर्धा | ४७ | ३३.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर कौटुंबिक उत्साह, गोड वार्तालाप व आनंदाच्या गाठीभेटी यातून उत्साह संचरेल.

**तुळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण बोलण्यातील कटुता अहंकाररहित शब्दांनी टाळण्याचा प्रयत्न करा.

**वृषभ :** शुभ रंग : नीळा, अनुकूल दिशा : पश्चिम स्वत:ची तब्येत योग्य साथ देत असेल तर काही नवे संकल्प करणे हितकारक ठरेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण वैवाहिक साथीदाराचा अगदी पत्नीचाही सल्ला अजिबात विसरू नका.

**मिथुन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम व्यावसायिक प्रश्नामध्ये यश मिळेल. कोणाशीही वादविवाद वाढविणे नुकसानकारक ठरेल.

**धनु :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर ताणतणावामुळे आजारपण उद्भवणार नाही याची काळजी घेणे.

**कर्क :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम खाण्यापिण्याची बंधने विसरू नका. कामकाजासंबंधी आपला शब्द प्रमाण मानला जाईल.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पश्चिम वेळ देणे अत्यंत हितकारक ठरेल. ठरविलेले कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध रहा.


**सिंह :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम शेजाऱ्याशी संबंध सलोख्याचे होतील. नुसते गप्पाष्टकांत अडकणाऱ्या मैत्रिणीपासून सावध रहा.

**कुंभ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण आपले हिशेब चोख ठेवावेत. संशयाला कोठेही जागा राहणार नाही असे बोलणे व कृती ठेवावी.

**कन्या :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : उत्तर खेळात प्रविण्य मिळेल. लहान लहान कोर्सेस आपले व्यक्तिमत्व फुलविणारे ठरतील.

**मीन :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : दक्षिण काही सूचक स्वप्ने भविष्याचा कानोसा देणारी ठरतील. परदेश प्रवासाचे स्वप्न पुरे होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८०



### आडवे शब्द

१. क्रिकेटमधील दोनशे
४. काळे मीठ
६. प्रधानमंत्री
९. चलनवलन
११. प्रमाणपत्र
१२. मुसलमान
१४. चाणाक्ष, हुशार
१६. वरपांगी
१८. पुष्पदल
१९. जोम, बळ
२०. शरम
२२. श्रीमंत
२५. गोदातीरावरील तीर्थस्थान
२७. श्रीरामाची चरित्रकथा
२८. पाचवा पांडव
३०. कपाळ फुटणे
३३. शरीर
३४. तेजस्वी, राजबिंडा
४०. गवत
४३. वाहणारी हवा
४४. शेराचा आठवा भाग
४६. धोबी
४७. निरूद्योगी
४९. चालढकल
५१. सुंदर तरुणी
५३. व्यर्थ
५४. गाय
५५. आचारी
५६. नवऱ्याची दुसरी पत्नी
५७. ओसाड (ग्रा.)
६०. ना नफा ना तोटा अशी स्थिती
६२. एकत्र येणे, गोळा होणे
६३. हिंदीत जवळ, इंग्रजीत उत्तीर्ण
६५. एकत्र होणे, गोळा होणे
६७. ही खरे तर साडेतीन हात एवढीच पुरे होते!
६८. जखमेवरील औषध
६९. पापडखार
७१. आधुनिक व्यवस्थापन तज्ञांनाही उपयोगी असा समर्थांचा ग्रंथ
७३. व्रत
७५. नाहक द्वेष (ला.)
७७. सावध
७८. चलाख, चुणचुणीत
७९. निमग्न
८०. न दिसणारी जखम

### उभे शब्द

१. दुसरा
२. तृष्णा
३. मनाचा ओढा
४. गेलेला दिवस
५. भरभर
६. पर
७. सरोवर
८. किरकिरीचे हे वाद्य मुहूर्तालाच वाजल्यावर काम कसे होणार!
१०. हा आसूड हल्ली दाद देण्यासाठी प्रसिद्ध नृत्यप्रकार
११. नवरा (ग्रा.)
१३. पक्के आश्वासन
१५. जवळ, निकट
१७. रक्षण करणारा
१८. पर्ण
२१. जनमत, लोकनिर्णय
२२. टक्कर
२३. बडबड्या
२४. आई (ग्रा.)
२६. पवित्र, शंकर
२७. दानव
२८. पत्नी
२९. राजमहाल, प्रासाद
३१. पारा
३२. साखरपाकात मुरवलेला आवळा
३५. लांब वासा
३६. गुजराथी
३७. विष
३८. मातीचा कण
३९. एक खमंग वडी
४१. पौर्णिमा
४२. नाहक विषयांतर करणे
४४. विचित्र
४५. चटणी करण्याचे बिनविजेचे साधन
४८. हिंदीत काल आणि उद्या
५०. डोक्याभोवती गुंडाळण्याचे वस्त्र
५२. अभिप्राय
५७. जड
५८. सामोपचार
५९. राजा
६१. नशा आणणारे
६४. बरोबर, सारखा
६५. सुताराकडील दातेरी हत्यार
६६. शांत
६७. लोकांचा कल
६८. पुष्परस
७०. विशेष
७२. कुढत न बसणारा
७४. तात्पर्य
७६. नदीकाठ
७७. मोलभाव

### जम्बो शब्दकोडे क्र. ९७८ चे उत्तर

आडवे उत्तर १.जोपासना ५.रसदार ८.निलाजरा १२.यमराज १३.यातना १५.लवाजमा १७.वारी १८.सकाळ १९.याद २०.क्षनभंगुर २२.अंजन २४.मना २५.माननीय २७.तट ३१.बेसावध ३३.यजमान ३५.सान ३६.जन ३८.रणरण ४०.नग ४१.आजतागायत ४४.हजरत ४६.मार ४७.तडकाफडक ५१.साप ५३.वार ५४.डकविणे ५५.नंदीबैल ५८.वानर ५९.माता ६०.रात ६१.लोह ६२.नकळत ६४.बेजार ६५.बारदान ६६.सवड ६८.नांगी ६९.बाकदार ७१.मनोहर ७३.साईबाबा ७४.तनय ७५.रविवार

उभे उत्तर : २.पायरी ३.सम ४.नारायण नारायण ६.सरकार ७.रया ८.निनाद ९.जलद १०.रावा ११.सीमा १४.तयार १६.जय जवान जय किसान १७.वार्ताहर १८.सगुण २०.क्षमताता २१.सरकारजमा २३.नट २५.मासा २६.नवसागर २९.मरण ३०.मज ३१.बेन ३४.मात्र ३७.नत ३८.रयतवारी ३९.रजक ४०.नजर ४२.तारका ४३.कडक ४५.तसदी ४८.डर ४९.फडताळ ५०.कविता ५२.परवानगी ५५.नंतर ५६.बैलोबा ५७.लहरबहर ५८.वादन ५९.माकड ६०.राजा ६२.नवलाई ६३.तडक ६४.बेकार ६७.समय ६८.नांगर ६९.बाबा ७०.दासी ७२.रवि

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## सेवा धर्माचे एक उपासक साहित्यिकांचे मित्र मॅनेजमेंट गुरु

# प्रोफेसर डॉक्टर शिवाजीराव कदम

: संकलक :
प्रा. सीए. डॉ. महादेव हरुबाई साहेबराव जाधव
( प्रा. सीऐ. डॉ.एम. एस. जाधव)



मला मुलंतः माणसांविषयीच अपार कुतूहल वाटते. माणसाचा स्नेह, लोभ, मैत्री मिळवून माणसाशी नाते जोडावे अशी माझी मनीषा असते. अशा जवळीकतेमधूनच गुणवंत, यशवंत, नामवंत माणसाच्या निकट सानिध्यात राहून जमल्यास त्यांच्या अंतर्मनात डोकावून त्यांचे समग्र व्यक्तिमत्व समजावून घ्यावे, त्यांची जडणघडण न्याहाळुन पहावी, अशी एक धडपड माझ्या मनी सततची असते. माझे भाग्य असे की अनेक क्षेत्रातील अनेक थोरा-मोठ्यांचा सहवास मला लाभला. त्यांच्या सौजन्याने मला त्यांच्या निकट राहता आले, मित्र जुळले आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडले अशा मोठ्या व्यक्तींपैकी प्रोफेसर डॉक्टर शिवाजीराव बयाबाई श्रीपतराव कदम हे एक.

सोनसळ सोनपावलांच्या माणसांचं गाव!! मातीचे सोनं करणाऱ्या गावांचे गाव!! चौरंगीनाथाच्या कृपा छत्रखाली सुखाने नांदणारे गाव ॥ भेटेल त्या माणसाला भगवंत मानणारे गाव ॥ माणसामाणसामधील प्रेमबंधाने भारवलेल्या गावाचे गाव ॥ सोनसळ !!! याच गावात डॉक्टर शिवाजीराव कदम सर यांचा जन्म झाला गरीबीच्या अंधारात चाचपडणाऱ्यांना हाताशी धरून त्यांना प्रकाशाची वाट दाखवणाऱ्या प्रकाश पुत्र जन्माला आला. हाच तो सोनसळचा सोनहिरा !! डॉक्टर शिवाजीराव कदम !

सांगली जिल्ह्यातील अतिशय दुर्लक्षित अशा खेडेगावातला मुलगा, आई वडील अशिक्षित, आई पूर्ण अशिक्षित तर वडील फक्त चौथीपर्यंत शिकलेले, आठ भावंडे एक बहीण त्यामुळे शाळेच्या शिक्षकांच्या सोयीनुसार ही जन्मतारीख लावली तीच जन्मतारीख म्हणजे 15 जून 1951. डॉ कदम यांचे पहिली ते पाचवी पर्यंतचे शिक्षण सोनसळ ह्या जन्मगावी पूर्ण केले तेथे तेवढीच सोय उपलब्ध होती त्यानंतर दररोज अडीच किलोमीटर पायी चालत जाऊन शिरसगाव येथे सहावी व

सातवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले आणि अभ्यासातील प्रगती असल्यामुळे मा. साहेबांनी रामानंदनगर येथे रयत शिक्षण संस्थेचे हायस्कूलमध्ये इयत्ता आठवी पासून दाखल केले आठवी, नववी, दहावी, अकरावी त्या ठिकाणीच पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी कराड येथे सायन्स कॉलेजमध्ये बी एस् सी पदवीशिक्षण पूर्ण केले. केमिस्ट्री हा विषय निवडण्यात आला

आणि त्यानंतर पुणे विद्यापीठाच्या नाशिक येथील एचपीटी महाविद्यालयात ऑरगॅनिक केमिस्ट्री साठी एम एस सी चे पहिले वर्ष व त्यानंतर पुणे विद्यापीठातील केमिस्ट्री विभागात दुसरे वर्ष पूर्ण करून एमएससी झाले त्यावेळी नुकतीच भारती विद्यापीठाची उच्च शिक्षणमध्ये सुरुवात झाली होती आणि त्याचाच उच्चांक म्हणजे त्यावर्षी तीन महाविद्यालये भारती विद्यापीठांनी सुरू केली त्यामध्ये मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, यशवंतराव मोहिते आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज व लॉ कॉलेज म्हणजे त्यावेळी भारती विद्यापीठात उच्च शिक्षण सुरू करण्यासाठी जे प्राध्यापक हवे होते त्यामध्ये उच्च शिक्षणमध्ये

भारती विद्यापीठाच्या 1978 साली उच्च शिक्षणची सुरुवात करणारे पहिले प्राध्यापक झाले आणि त्यानुसार रसायनशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून कामाला सुरुवात केली आणि त्यानंतर शिक्षणाची आणि त्याप्रमाणे इतर विषयांची सुरुवात झाली

भारती विद्यापीठाने उच्च शिक्षणमध्ये सुरुवात केलेली असल्यामुळे महाविद्यालयाचे प्राचार्य होण्यासाठी आपल्याला पीएचडी हे शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे त्यानुसार 1979 मध्ये पीएचडीचा प्रवेश घेऊन पीएचडीच्या संशोधनाला सुरुवात केली. सकाळी यशवंतराव मोहिते महाविद्यालयात शिक्षकाची नोकरी करावयाची व दुपारच्या वेळात पुणे विद्यापीठात जाऊन पीएमटीने अथवा सायकलने जाऊन अथवा स्कूटरने जाऊन संध्याकाळी उशीर पर्यंत थांबून पद्धतीप्रमाणे पीएचडी शिक्षण पूर्ण केले त्यांचे गाईड होते मा. डॉ बाळासाहेब कुलकर्णी सर .

1982 मध्ये पीएचडीचे पदवी प्राप्त झाल्यानंतर भारती विद्यापीठाने 1981 मध्ये फार्मसी कॉलेज सुरू केले होते आणि त्या महाविद्यालयाला केमिस्ट्री विभागात केमिस्ट्री विषय असणारा पीएचडी धारक असल्याने डॉ कदम सरांची त्या ठिकाणी नेमणूक केली आणि पुणे विद्यापीठातील पहिले फार्मसी महाविद्यालय व त्या महाविद्यालयाचा पहिला प्राचार्य त्याच पद्धतीप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील पाच जिल्हे आणि पहिलेच महाविद्यालय त्यामुळे लहान वयात प्राचार्य पदी पोहोचलेला हा एकमेव प्राचार्य अशी सरांची ख्याती पुणे विद्यापीठामध्ये होती.

महाविद्यालयाची प्राचार्य त्याचप्रमाणे भारती विद्यापीठामध्ये सहकार्यवाह म्हणूनही जबाबदारी सरांच्यावर रवांद्यावर पडली आणि त्यानुसार मग भारती विद्यापीठाच्या सर्व उच्च शिक्षणाच्या जडणघडणीमध्ये सरांचे मोठे योगदान हे आपण जाणतोच आहोत पाहतोच आहोत

पवित्र, पावन आणि परोपकारी निर्मळ, निर्लस आणि निरामय साहसी सतेज आणि समंजस प्रवाह प्रेममय आणि पारदर्शक आनंदी अभिमानी आणि आत्मज्ञानी शिक्षण प्रसाराच्या माध्यमातून महाराष्ट्राला प्रगतीपथावर पोहचविण्याचे कौतुकास्पद कामगीरी करून सोडणारे एक महान व्यक्तिमत्व, माणुसकीच्या भावनेने ओतलेले एक उदार व्यक्तिमत्व प्राध्यापक डॉक्टर शिवाजीराव कदम सर प्रा. डॉ. कदम सर हे वारकरी घराण्यातून उदयास आलेले एक महान व्यक्तिमत्व ज्यांची कुळी पंढरीची वारी !! ज्यांची पाय धूळ लागो माती !!

असा भक्ती भाव आजही त्यांच्या मनात भरलेला आहे. आई-वडिलांच्या विषयी परम वंदनीयता, वडील बंधू विषयी आदरभाव, गुरुजनांच्या विषयी कृतज्ञता, विद्यार्थ्यांबद्दल नितांत प्रेमभावना, मित्रांबद्दल कमानी चा स्नेहभाव, गरीबाबद्दल कणाव अतिथी बद्दल आपुलकी, थोर पुरुषांविषयी अस्मिताभाव आणि देशाविषयी उत्कट प्रेमभाव ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक वैशिष्ट्य आहे एक आदर्श विद्यार्थी यशस्वी शिक्षक जाणता प्राचार्य आणि द्दष्टा कुलगुरू आणि कुलपती म्हणून त्यांचा नावलौकिक आहे

या सर्व बिरुदावलीतील श्रेष्ठ काय असेल तर त्यांच्या ठाई उसंडून वाहणारी माणुसकी त्यांच्या ठायी असलेली सुशीलता साधेपणा सात्विकता सोज्वळता समरसता आणि सुशिक्षित्ताता पाहिल्यानंतर देवघरातील नंदादीपाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही असे मला वाटते.

माननीय डॉक्टर शिवाजीराव कदम सर आणि माझा तसा 1984 साली आलेला अनुभव आहे. माझे एम कॉम झालेलं होतं आणि भारती विद्यापीठांमध्ये प्राध्यापकाची जागा त्याबाबतच्या मोहिते कॉलेजला प्राध्यापकाची जागा भरण्यासाठी जाहिरात आली होती त्या जाहिरातीला अनुसरून मी अर्ज केला अर्जानुसार मला मुलाखतींसाठी कॉल आला होता.

त्यानुसार मी मुलाखत देण्यासाठी गेलो मुलाखत झाली आणि त्यानंतर मा. साहेबांनी मला मुलाखती संपल्यानंतर उद्यापासून जॉईन व्हा मी म्हणालो मी जॉईन होण्यासाठी आलोच नव्हतो मग मा. साहेबांनी विचारलं कशासाठी आला होता ? मी म्हणालो आपल्या संस्थेच्या महाविद्यालयात प्राध्यापक नेमणूकीसाठी जाहिरात होती मला असं वाटलं इथे ओळख असलेल्या/ वशिल्यावर प्राध्यापक नेमणूक केली जाते

हे मी टेस्ट करण्यासाठी आलो मग मा. साहेबांनी विचारले मग तुला काय कळलं ? मी त्याला उत्तर दिलं होतं साहेब माझी तुमची भेट नाही कुठल्याही सदस्याला मी भेटले नाही मी एमकॉम झालो होतो मी सीऐ ची आर्टिकल शिफ करत आहे नियमानुसार मला नोकरी करता येत नाही पण तरीसुद्धा मी खात्री करण्यासाठी आलो होतो मग काय तुझी खात्री झाली का ? असे मा. साहेबांनी विचारले मी उत्तर दिलं होतं की इथे फक्त क्वालिटी क्वालिटी क्वालिटीवरच प्राध्यापकांची

नेमणूक केली जाते फक्त गुणवत्ताधारकांनाच या शिक्षण संस्थेत प्राध्यापक म्हणून घेतले जाते हे मला कळलं. मग साहेबांनी विचारलं मग आता काय करणार मी उत्तरलो आर्टिकलशिप करणार सीए होणार. त्यानंतर मा. साहेबांनी सांगितलं ठीक आहे तू जॉईन नाही झाला तरी चालेल पण तुझ्यासाठी भारती विद्यापीठाचा दरवाजा सदैव खुले आहेत म्हणजे या मोठ्या मनाचा माणूस का मला त्यावर्षी कळला आणि मी त्यानंतर 1984 - 85 पासून मी कायम डॉ. शिवाजीराव कदम सर माननीय साहेब माननीय वहिनीसाहेब या सर्वांशी एक आपुलकीचं नात्याने वावर असतो याचा सार्थ अभिमान वाटतो म्हणजे कदम कुटुंबियांचे असणारी ही जवळीक, माणुसकीची भावना ही त्यांनी चालू ठेवलेली आहे याचा सार्थ अभिमान माझ्यासारखा एका सर्वसामान्य विद्यार्थ्याला वाटतो.

शिक्षण म्हणजे जीवन आणि जीवन म्हणजे शिक्षण शिक्षण ही जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे शिक्षणातून माणसे सदाचारी बनवावीत सदाचारातून साधक बनवावीत साधकातून सेवक बनवावीत या प्रशिक्षणाचे खरे सार्थक आहे. शिक्षण ही समाजाची एक भांडवल ठेव आहे त्यातूनच पिढ्यानपिढ्या घडत जातात विकसित होतात असे हे शिक्षण समाज परिवर्तनाचे मुख्य अंग असले असते हे नीट ओळखूनच शिक्षणातून आणि समाज परिवर्तन करावे आणि समतेची अधिष्ठान लाभलेला नवा समाज निर्माण करावा याच ध्येय ध्यासाने कुलपती डॉक्टर शिवाजीराव कदम सर प्रेरित झालेले आहेत त्यामुळेच भारती विद्यापीठ हे केवळ पुस्तके शिक्षण देणारे विद्यापीठ नसून न्याय समता बंधुता या तत्त्वांच्या विकासासाठी माणसे घडवणारे विद्यापीठ आहे याचा आवर्जून उल्लेख या ठिकाणी करावा लागतो. वयाच्या 76 या वर्षात डॉ कदम सर पदार्पण करीत आहेत याचा सार्थ अभिमान आपल्या सर्वांना आहे.

एक श्रेष्ठ औषधनिर्माण शास्त्रज्ञ म्हणून कुलापती डॉक्टर शिवाजीराव कदम सर यांचा जीवन प्रवासाचा आदर्श जेवढा आनंददायक तेवढा अभिमानास्पद वाटतो, जेवढा अनुकूल अनुकरणीय तेवढा अस्मिता दर्शक वाटतो, जेवढा ज्ञानसंपन्न तेवढा कर्तृत्व संपन्न वाटतो, जेवढा पारदर्शी तेवढा दूरदर्शी वाटतो, जेवढा चित्त वेधक तेवढा चैतन्यशील वाटतो आणि जेवढा माननीय तेवढा चिंतनीय वाटतो एक झपाटलेला संशोधक म्हणूनच डॉक्टर शिवाजीराव कदम सरांची नाम मुद्रा आंतरराष्ट्रीय पातळीवर झरकत आहे. त्यांचे औषध निर्माण शास्त्रातील सारे संशोधन मानव जीवनाला अतिव हिताव आहे त्यांच्या प्रेरणेतूनच भारती विद्यापीठाचे औषध निर्माण शास्त्रातील संशोधनाचे अत्यंत लक्षणीय केंद्र म्हणून नावाजलेली आहे आणि डॉ कदम सरांचे प्रकाशित असलेले शोधनिबंध 172 पेक्षा जास्त शोध निबंध प्रकाशित करून त्याचा उपयोग समाजाला होऊन त्याचा स्कोपस इंडेक्स हा उत्तम आहे. डॉ कदम सर थोर शास्त्रज्ञ औषध निर्माण शास्त्राची शाखा पुणे विद्यापीठात निर्माण करणारे पहिल्या कॉलेजचे पहिले प्राचार्य पुणे विद्यापीठांमधील औषध निर्माण शाखा निर्माण केली त्या शाखेचे अधिष्ठाता म्हणून काम केलं त्याचप्रमाणे राज्य पातळीवर औषध निर्माण शास्त्रामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर औषध निर्माण शास्त्र संस्थेचे कार्यकारिणीचे सदस्य

आणि त्याच संस्थेचा जीवनगौरव पुरस्कार आणि त्या व्यतिरिक्त विविध परिषदांमध्ये, चर्चा सत्रांमध्ये, विविध सेमिनारमध्ये आपले विचार व्यक्त करून आपले असणाऱ्या संशोधनाचा उपयोग इतरांना व्हावा व कायमचा ठेवा होईल अशा पद्धतीचं काम औषध निर्माण शास्त्र शाखेमध्ये माननीय डॉक्टर कदम सरांनी केलेले आहे.

भारती विद्यापीठाच्या जडणघडणीमध्ये डॉक्टर शिवाजीराव कदम सर यांचा महत्त्वाचा वाटा आहे मा. साहेबांनी नियोजन करण्याचे आदेश द्यायचे आणि त्या आदेशांची साहेबांच्या इच्छेप्रमाणे त्याची परिपूर्ती करण्याची

पुढील पानावर ››



यशवंतराव मोहिते महाविद्यालयाच्या विज्ञान संशोधन भवन वास्तुचे उद्‌घाटन राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा.ना.सुशिलकुमार शिंदे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी मा.ना.डॉ.पतंगराव कदम, मा.मोहन धारीया, मा.यशवंतराव मोहिते, डॉ.शिवाजीराव कदम.



पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.श्रीधर गुप्ते, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.अरूण निगवेकर, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.राम ताकवले तसेच डॉ.अशोक कोळस्कर यांचे समवेत कुलगुरू डॉ.शिवाजीराव कदम.

# प्रोफेसर डॉ. शिवाजीराव कदम वाढदिवस विशेष...

जबाबदारी डॉ कदम सरांची असायची. भारती विद्यापीठाच्या बांधलेल्या सर्व महाविद्यालयाच्या इमारती बांधकाम समिती या नात्याने डॉ कदम सरांनीच करवून घेतले आहे. इमारती बांधकाम त्याचे डिझाईन यामध्ये मोठं योगदान आहे. एक जिवंत उदाहरण आहे आपल्याला आठवते बऱ्याच वेळा डॉ कदम सरांच्या समवेत सांगलीला णजायचा योग आला बारा महिन्यांमध्ये सांगलीचे मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल बांधून तयार करून त्या पद्धतीने इन्स्पेक्शनला उत्तम पद्धतीचं दाखवणार मग त्यासाठी किती हेलपाटे झाले असतील ते त्यांनाच माहीत त्यावेळी दिवसातून एकदा सांगलीला जाऊन यायचे. एक दिवस पुण्यात काम पुन्हा तिसऱ्या दिवशी सांगलीला जायचं बांधकामाची सगळी माहिती घ्यायची त्याचा नियोजन करायचं परत सायंकाळी परत अशाप्रमाणे बारा महिन्यांमध्ये सांगलीचे इतकं भव्य दिव्य असे मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल

उभे करून त्या पद्धतीप्रमाणे पाहणी समितीस दाखवणारे हे अशा पद्धतीचं काम कदम सरांनी केलेले आहे. भारती विद्यापीठाचे नॅक अक्रेडिशन असेल भारती विद्यापीठाचे संशोधन प्रकल्प, भारती विद्यापीठाला इतर वेगवेगळी मानांकने मिळवायची असतील यामध्ये महत्त्वाची भूमिका डॉ. शिवाजीराव कदम सरांनी बजावली आहे याबद्दल म्हणजे त्यांचं कौतुक करावे एवढं कमी आहे.

त्याचप्रमाणे डॉ कदम सरांचे पुणे विद्यापीठातील कामाबद्दल बोलायचे म्हटल्यानंतर त्याविषयी खूप लिहिता येईल पण त्यातील काही मोजके अनुभव तुमच्यासमोर मी विशद करत आहे. डॉक्टर गोवारीकर सर हे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना डॉक्टर शिवाजीराव कदम सर हे त्या ठिकाणी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य होते तसे माननीय कदम सरांचे पुणे विद्यापीठांमध्ये विविध अधिकार मंडळावर विविध पदांवर काम केलेले आहे सदस्य व्यवस्थापन परिषद, कार्यकारी मंडळ सदस्य, सिनेट सदस्य, विद्वत सभा सदस्य, अधिष्ठाता फार्मसी विद्याशाखा, सदस्य पुणे विद्यापीठ महाविद्यालय विकास मंडळ, अध्यक्ष फार्मासी सायन्सेस अभ्यास मंडळ, अध्यक्ष स्थायी समिती याशिवाय विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समिती, विविध निवड समिती अशा विविध समित्यांचे सदस्य व अध्यक्ष म्हणून काम केलेलं आहे. पुणे विद्यापीठात कार्यकाळ सुमारे 1988 ला सुरू झाला आणि जवळजवळ 2010 पर्यंत सर या ना त्या कामाने कारणाने पुणे विद्यापीठाशी संबंधित होते इतका प्रदीर्घ कालावधीत पुणे विद्यापीठात काम करत असताना अधिष्ठाता, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिनेट मेंबर, अकॅडमीक कौन्सिल मेंबर या वेगवेगळ्या सभांचे सदस्य स्थायी समितीचे सदस्य पण या कालामध्ये पुणे विद्यापीठाचा मी फायनान्स अकाउंट ऑफिस म्हणून 10 वर्ष काम केलं आहे त्यामुळे मला कदम सरांचे एकही ट्रॅव्हलिंगचं बिल किंवा टीएडीएचे एकही बिल सरांनी मागितलेलं नाही आणि सरांनी घेतलेले नाही म्हणजे पुणे विद्यापीठाच्या

इतिहासामध्ये ही एकमेव घटना अशी असेल की इतक्या अधिकार मंडळावर काम करणारे सदस्य/ अध्यक्ष किंवा कॉलेजच्या स्थानिक चौकशी समितीचे सदस्य, निवड समितीचे सदस्य स्थानिक चौकशी समितीचे अध्यक्ष निवड समितीचे अध्यक्ष विविध समितीचे सदस्य म्हणून ट्रॅव्हलिंगचा एकही भत्ता किंवा ट्रॅव्हलिंगचा एकही पैसा पुणे विद्यापीठाचा घेतलेला नाही हे आवर्जून या ठिकाणी उल्लेख करावा लागेल

पुणे विद्यापीठातील शिक्षकेतर सेवकांची संख्या सुमारे 1200 च्या आसपास आणि शिक्षकांची संख्या सुमारे 300 च्या आसपास आहे या बाराशे सेवकांचा या वीस वर्षाच्या कालावधीमध्ये असा एकही प्रश्न नसेल की ज्याला सरांनी सोल्युशन दिलेले नाही कोणतेही कुलगुरू असले तरी सेवकांच्या प्रश्नांच्या बाबतीत सरांचे अध्यक्षतेखाली कमिटी आणि त्यानुसार सरांनी त्या प्रश्नांची सोडवणूक करायची म्हणजे पुणे विद्यापीठातील चतुर्थ श्रेणीच्या सेवकापासून कुलगुरू पर्यंत सर्व व्यवस्थापन मंडळातील सर्व अधिकार मंडळातील सर्व सदस्य सरांचे असणाऱ्या त्यांच्या संबंध हे एक वेगळंच आपल्याला केमिकल पाहायला मिळाले. सर्वांशी माणुसकीने सर्वांशी आपुलकीने वागून सर्व प्रश्न सोडवण्याचं काम हे सरांनी केलेले आहे. डॉ वसंतराव गोवारीकर सर कुलगुरू असताना डॉक्टर शिवाजीराव कदम सर यांना उपकुलगुरु म्हणून नेमणुकीसाठी







मा. राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय विधी दिन पुरस्कार–२००७ स्विकारताना.




शिक्षणमहर्षी डॉ.पतंगराव कदम विद्यालय, दौंडज, ता.पुरंदर, जि. पुणे येथील भव्य वास्तूचे भूमिपूजन प्रसंगी

साहेबांच्याकडे आग्रह धरला पण साहेबांनी तो स्पष्टपणे नाकारला त्याचप्रमाणे डॉक्टर अरुण निगवेकर सर कुलगुरू झाल्यानंतर सुद्धा त्यांनी माननीय डॉक्टर पतंगराव कदम साहेबांना की डॉक्टर शिवाजीराव कदम मला उपकुलगुरु म्हणून द्या अशा पद्धतीची विनवणी केली पण साहेबांनी कुठल्याही वेळी मान्य केले नाही. डॉ वसंतराव गोवारीकर सर दवाखान्यात असताना त्यांना भेटायला डॉक्टर शिवाजीराव कदम सर डॉक्टर भूषण पटवर्धन आणि मी स्वतः गेलो होतो त्याचा मी साक्षीदार आहे तर डॉक्टर वसंतराव गोवारीकर हॉस्पिटल मध्ये असताना म्हणाले होते की, मी डॉक्टर शिवाजीराव कदम सारख्या एका संशोधक व्यक्तीला पुणे विद्यापीठांमध्ये उपकुलुगुरु म्हणून आणू शकलो नाही ही माझी सर्वात मोठी चूक झाली.

त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठातील एक प्रसंग सांगायचं म्हटलं तर डॉ वसंतराव गोवारीकर सर सिनेटचे अकॅडमी कमिशनचे अध्यक्ष चौरे सर बाबुराव चौरे सर उपलोगुरु आणि रजिस्टर त्या पद्धतीने एमजी शिंदे प्रभारी रजिस्टर तर त्यानुसार ते काम चालू असताना प्रभारी रजिस्टर अशा पद्धतीचा विषय 1996 ची घटना असेल आणि त्या काळात अकॅडमी कौन्सिलची मीटिंग चालू होती त्या मीटिंगमध्ये कदम सर एका उशिरा पोहोचले त्याच्या अगोदर एका संस्थेचा बीएससी

बीएससी कम्प्युटर सायन्स म्हणजे पूर्वीच बीसीएस अशा पद्धतीचा अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव होता व

विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीने त्या पद्धतीने भेटी दिल्या होत्या काही त्रुटी दर्शवल्या होत्या आणि त्याच्या बेसवर विद्वत सभेने म्हणजे अकॅडमी कौन्सिलने ठराव जवळजवळ कन्क्लुजन ला आले होते की आता हे कॉलेजला मान्यता द्यायचे नाही हे कॉलेज सुरू करावे द्यायचे नाही अशा परिस्थितीत डॉ कदम सर उशिरा त्या अकॅडेमीक कौन्सिल च्या मीटिंग ठिकाणी पोचले आणि त्यांनी डॉ वसंतराव गोवारीकर सर अध्यक्ष असल्यामुळे त्यांना विनंती केली मा कुलगुरू सर मला या विषयावर बोलायचे आहे आणि ज्या ठिकाणी कॉलेज बंद करायचं किंवा कॉलेजला विद्यार्थी प्रवेश द्यायचे नाही असा जवळजवळ नक्की झालेले असताना डॉ कदम सरांनी फक्त तीन / चार मिनिटे बोलले आणि सांगितले की आपल्याला असे करता येणार नाही त्याची कारण मीमांसा सांगितली कॉलेज

मध्ये कुठलाही एरवादा विषय सुरु करायचा असेल तर हा नाही प्रत्येकाला संधी दिली पाहिजे असे धोरण आहे आणि संस्थाचालकांनी त्यासाठी घेतलेले परिश्रम त्यांनी केलेले काम आणि त्यानुसार त्यांनी कॉलेजची केलेली तयारी आणि आता आपण अचानकपणे या महाविद्यालयाला बंद करण्यासाठी किंवा विषय सुरु करण्यासाठी परवानगी नाकारत असू तर हे चुकीचे आहे. जरी संस्थापक हे वेगळ्या

विचारसरणीचे असतील संस्था एकमेकाची स्पर्धक असली तरी त्यांच्या बाबतीत घेतलेला निर्णय योग्य नाही आणि याबाबत डॉ कदम सरांनी केलेले विवेचन सर्व सदस्यांनी मान्य केलं आणि तो नकारात्मक झालेला ठराव सरांनी होकारात्मक करून घेतल्याने कुलगुरू डॉ वसंतराव गोवारीकर सर त्यावेळी म्हणाले सुद्धा होते की हे आपण आता फक्त डॉ शिवाजीरावांचेच ऐकत जाऊ. काही विशेषतः असा विषय आला की आपण डॉ शिवाजीरावांना सांगू की तुम्ही बोला तुम्ही सांगा त्याप्रमाणे ठराव होईल अशा पद्धतीचा एक आदरभाव सरांनी निर्माण केलेला होता .विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही गंभीर प्रश्नाच्या सोडवणूक करण्यात डॉ कदम सरांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करीत असत बाबतीतील आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्याचप्रमाणेअनेक वेळा मा कुलगुरू सर विविध गंभीर विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी तर रात्रीच्या साडेदहा वाजता सुद्धा मीटिंगसाठी डॉ. कदम सरांना, डॉक्टर भूषण पटवर्धन व इतर सदस्यांना व्यवस्थापन परिषदेत सदस्य असताना संबंधित मा कुलगुरू घरी बोलवायचे आणि यावर काय निर्णय घ्यावा अशा पद्धतीने काही निर्णय घेतले काही वेळा मा.कुलगुरू तर राजीनामा देण्याच्या तयारीत असायचे आणि ते स्वतः त्या पद्धतीने फोन करायचे तर हे सर्व विषयांचे मतपरिवर्तन करून एक चांगलं विद्यापीठ कसं होईल आणि त्या विद्यापीठाचे आपण कुलगुरू कसे आदर्श आहात असं

सांगून त्यांना पटवून देऊन त्या पद्धतीने काम करून घेण्याची कला डॉक्टर शिवाजीराव सरांच्याकडे आहे हे याचा मी साक्षीदार आहे हे मी डोळ्यांनी पाहिलेला आहे म्हणून मी या ठिकाणी मुद्दामून आपल्याला आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य असताना मला एक दोन अनुभव आठवतो तो मुद्दामून या ठिकाणी सांगतो पुणे विद्यापीठाचे त्यावेळचे प्रभारी कुलसचिव कैलासवासी एमजी शिंदे आणि वित्त विभागाचा प्रमुख म्हणून वित्त व लेखाधिकारी म्हणून सेवेत होतो

या ठिकाणी काम करत असताना आम्हा दोन्ही अधिकाऱ्यांना बोलवत असत वप्रशासन आणि वित्त विभाग या दोन्ही विभागात समन्वय असला पाहिजे.

प्रत्येकाचे मत भिन्न असतेच पण समन्वय साधणे गरजेचे हे आम्हाला दोघांनाही सांगायचे की तुम्ही सर्वसामान्य कुटुंबातले आहात त्यामुळे तुम्हाला चांगली पदे मिळालेली आहेत हेवेदावे न करता दोघांनी समन्वयाने चांगले काम करा की जेणेकरून आपले विद्यापीठ आदर्श होईल जेणेकरून आपले विद्यापीठ उंचीला पोहोचेल मोठ्या उंचीला पोहोचेल अशा पद्धतीचे सुद्धा मार्गदर्शन करणारे सर मी अनुभवलेले आहेत मी पाहिलेले आहेत म्हणून मुद्दामून याचा येथे उल्लेख केला. समिती नियुक्त करून सर्वांना समाधानकारक तोडगा / उत्तर दिले जात असे.

सरांची एक सवय मात्र सर्वांना आवडते / भावते की आपण केलेल्या मदतीचा कोणताही गाजावाजा न करता ते काम / मदत करत राहतात याचे उत्तर उदाहरण आदरणीय बाळासाहेब भारदे आजारी असताना त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचं काम मा. डॉ. शिवाजीराव कदम सरांनी केले याचा मी साक्षीदार आहे महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष माननीय बाळासाहेब भारदे थोर विचारवंत थोर गांधीवादी नेते पण आजारी असताना सरांनी जणू आपले वडील आजारी आहेत अशा पद्धतीप्रमाणे त्यांचे काळजी घेतली व सेवा केली दुसरे उदाहरण सांगताना पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू सुमारे पाच विद्यापीठांचे कुलगुरू होते व ज्यांनी वयाची सुमारे 20 वर्ष कुलगुरू पदावर काम केलं असे डॉक्टर राम ताकवले सर त्यांच्या बाबतीत असेल, मा डॉ शरदचंद् गोखले सरांच्या बाबतीत असेल, थोर साहित्यिक व विचारवंत आणि व्यारव्याते डॉ. शिवाजीराव भोसले यांचे बाबतीत असेल, थोर विचारवंत शंकरराव खरात सरांच्या बाबतीत असेल या सर्वांना वैद्यकीय बाबत आजारपणामध्ये असणारी गरजेची मदत सरांनी सर्वांना केलेली आहे याचा उल्लेख करताना मला आनंद होतो आणि त्याचेच आशीर्वाद, सदिच्छा सरांना आता मिळताहेत आणि उत्तम आरोग्य लाभलं आहे हे तर केवळ याचंच हे प्रतीक आहे भीषण आजारावर मात करून एक उत्तम पद्धतीचे जीवन जगणारा एक कुलगुरू, एक कुलपती, एक प्राचार्य, एक शिक्षक, एक संशोधक आपल्याला आता पाहायला मिळतोय मा डॉ कदम सरांचे रूपाने याचे सर्व श्रेय त्यांनी केलेलं काम त्यांचा प्रामाणिकपणा, गरिबीची असणारी जाणीव याला जाते .विद्यापीठ अनुदान आयोगाचे सदस्य असताना लागोपाठ दोन वेळा म्हणजे तीन आणि तीन वर्ष म्हणजे सहा वर्षे भारतातील सर्व विद्यापीठांची सर्वोच्च संस्था या विद्यापीठ अनुदान आयोग या आयोगाचे सर सहा वर्ष सदस्य होते या काळात त्यांनी तिथल्या सर्व म्हणजे शिपायापासून ते चेअरमन पर्यंत सर्वांना एक प्रकारचा जिव्हाळा लावला होता की सर् हे युजीसी गेल्यानंतर ज्याप्रमाणे मोहोळ असते अशा प्रमाणे सगळे युजीसी मधील पाच पंचवीस लोकसरांच्या बरोबर सतत फिरत असताना पहावयास मिळायचे. त्याचवेळी त्यांचा सहा वर्षाचा कालावधी संपल्यानंतर सरांना जो निरोप समारंभ दिला चेअरमनला सुद्धा निरोप समारंभ होणार नाही अशा पद्धतीचा एक देखणा समारंभ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सर्व सेवकांनी सर्व सदस्यांनी केला असा देखणा सोहळा असा कुठल्या सदस्याला विद्यापीठ अनुदान आयोग स्थापन झाल्यापासून मिळाला नसेल अशा पद्धतीचा एक पद्धतीचा निरोप समारंभ सरांना मिळाला ही प्रचिती सरांनी केलेल्या कामाची पावती होती.

पुढील पानावर››



कुटुंब सदस्य डॉ. राहुल, डॉ. शिवाजीराव कदम, सौ. रजनीताई आणि सुकन्या सुविता कदम

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. १४ जून २०२६

# प्रोफेसर डॉ. शिवाजीराव कदम वाढदिवस विशेष...



जागतिक किर्तीची योगगुरू अयंग्गार यांचे समवेत.



गांधी जयंतीनिमित्त महात्मा गांधींच्या मूर्तीस अभिवादन करताना विश्वस्त डॉ.कदम, सोबत अध्यक्ष: डॉ.कुमार सप्तर्षी आणि सचिव: राजन अन्वर



डॉ.पतंगराव कदम सत्कार स्वीकारताना. यावेळी डॉ.कदम, डॉ.जाधव, कै.डॉ. पतंगराव कदम, कै.चंदुकाका जगताप

## उद्योजकता

शिक्षण क्षेत्राबरोबरच डॉक्टर कदम सर यांनी शेती उद्योगाच्या विकासातही महत्त्वपूर्ण योगदान दिलेल आहे प्रत्यक्ष शेती व शेतीचे अर्थशास्त्र या विषयातील एक जाणकार आहेत त्याचीच प्रचिती म्हणून त्यांनी उदगिरी सागर उदगिरी शुगर अँड पावर लिमिटेड या शेतकरी साखर कारखान्याची बामणी, विटा, तालुका खानापूर या छोट्याशा गावात 2010 मध्ये एका वर्षात साखर कारखान्याची उभारणी केली व त्यातून साखर निर्मिती करण्यास सुरुवातही केली. उदगिरी साखर कारखान्यात ऊर्जासहनिर्मिती संच चालू आहे त्याचप्रमाणे ब्डिसलरी ची सुरुवात केली आहे उत्तम पद्धतीचा बायोगॅस कंपोस्ट खताचे उत्पादन केले जाते म्हणजे एक शिक्षक उद्योगपती होऊ शकतो याचे उत्तम उदाहरण सरांनी उभा केलेला साखर कारखाना

एका यशस्वी पुरुषामागे एक यशस्वी स्त्री असते याप्रमाणेच डॉक्टर कदम सरांच्या कर्तुत्वामध्येही आणि नेतृत्व व कर्तृत्व फुलवण्यामागे त्यांच्या सुशील धर्मपत्नी रजनीताईंचा सिंहाचा वाटा आहे हे आपण सर्वजण जाणतो कधीही कोणत्याही समारंभात न दिसणाऱ्या सौ. रजनीताई मात्र सतत डॉक्टर कदम सरांना प्रोत्साहन देत पुढील कार्यकरणेसाठी शक्ती देण्याचे अवघड काम आज अखेरपर्यंत करत आहेत अशा धर्मपत्नी डॉक्टर कदम सरांना लाभल्या आहेत भारती विद्यापीठाचे भाग्य आणि त्या भाग्यामुळे डॉक्टर पतंगराव कदम, डॉक्टर शिवाजीराव कदम हे शिक्षण क्षेत्रातील राम लक्ष्मण म्हणून कैलासवासी बाळासाहेब भारदे संबोधायचे. डॉक्टर कदम सरांच्या कार्याची प्रेरणा ही त्यांच्या घरातच असल्याने मार्ग सोपा झाला आणि या पर्यंत सरांचे व कुटुंबाचे सर्व सांभाळण्याचे कार्य हे सरांच्या धर्मपत्नीने केलेले आहे याचा आपणा सर्वांना आनंद आहे सौ रजनीताईंची नीटनेटकी राहणी लक्षवेधी आहे त्यांच्या वागण्या बोलण्यातून उच्च अभिरुचीचा प्रत्यय सतत येत असतो त्यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व डॉक्टर कदम सरांचे कर्तृत्व पुलावण्यामागे आहे याचा सार्थ सर्वांना अभिमान आहे कमी बोलणे आणि कृतीशीलता करीत राहणे हा सौ. रजनीताईंचा स्वभाव त्यामुळेच डॉक्टर कदम सर सतत संस्थेच्या कामानिमित्त दौऱ्यावर व कार्यालयीन कामात गुंग असताना घरातील सर्व जबाबदारी उत्तम पद्धतीने पार पाडून एक उत्तम उद्योजक, उच्चशिक्षित आणि विज्ञान आणि अध्यात्म यांचा संगम यांच्या जीवनात आहे अशा पुत्ररत्नाला डॉक्टर राहुल कदम यांना वाढविण्याचे घडविण्याचे सर्व श्रेय हे त्यांना जाते आणि आई-वडिलांचे संस्कार घेऊ कन्या सविता हा आदर्श उद्योग व्यवसाय क्षेत्रात कार्य करत आहेत. या सुखी कुटुंबाचे आनंद वाढवण्याचे कार्य आजही सौ. रजनीताई सातत्याने करत आहेत. डॉक्टर राहुल सारखा पुत्र ज्याची काम करण्याची क्षमता, जिद्द, उपक्रमशीलता सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची वृत्ती, सतत मदतीचा हात यामुळेच उदगीरी शुगर अँड पावर लिमिटेडच्या साखर कारखान्याचा झालेला छोटा कालावधीतील विकास, विस्तार आपण सर्वजण पाहतो आहोत उदगीरीचे नेतृत्व आणि प्रशासन खंबीर व आदर्श प्रत व्यवस्थापनाच्या मान्यता प्रमाणे चालवण्याचे कार्य डॉक्टर राहुल कदम सर हे डॉक्टर कदम सरांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम पद्धतीने करत आहेत त्यामुळेच कदम सरांना जीवनात जे प्रामाणिक कष्ट केले त्याचे सोने झाले असे नेहमीच वाटत राहणाऱ यात शंका नाही आणि डॉक्टर राहुल कदम यांना खंबीर साथ त्यांच्या धर्मपत्नी सौ डॉक्टर देवयानी ह्या देत आहेत त्यामुळेच उदगिरी शुगरचा झंजावात जोरात चालू आहे याचा मनस्वी आनंद डॉक्टर कदम सरांना होत राहणार यातील मात्र शंका नाही

डॉक्टर शिवाजीराव कदम सर यांना जीवनामध्ये त्यांचे माता पिता, वडील बंधू माननीय नामदार कैलासवासी डॉक्टर पतंगराव कदम साहेब,

पुढील पानावर


## ◇ हार्दिक अभिष्टचिंतन ◇

१५ जून



जिवेत शरदः शतम्



१५ जून

मा. डॉ. शिवाजीराव कदम (सर)
संस्थापक, उदगिरी शुगर अँड पॉवर लि.

मा. आमदार मोहनराव कदम (दादा)
चेअरमन, सोनहिरा सहकारी साखर कारखाना

# प्रोफेसर डॉ. शिवाजीराव कदम वाढदिवस विशेष...



सासवड येथील श्री शिवाजी इंग्लिश मेडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजला दिलेल्या भेट प्रसंगी डॉ. कदम, डॉ. जाधव, आमदार संजय जगताप.



कदम परिवारातील प्रमुख मार्गदर्शक, दिशादर्शक व अंमलबजावणीकार त्रिमूर्ती माननीय नामदार डॉक्टर पतंगरावजी कदम, माननीय नामदार मोहन शेठ कदम आणि माननीय प्रोफेसर डॉक्टर शिवाजीराव कदम सर.



गृहमंत्री दिलीप वळसे पाटील व कै.बाळासाहेब भारदे यांचे हस्ते अभ्यासक्रमाचे प्रकाशन करताना समवेत डॉ.कदम, डॉ.जाधव



## संकलन व लेखन

**प्रा. सीए. डॉ. महादेव हरुबाई साहेबराव जाधव**

(प्रा. सीए.डॉ.एम. एच्.एस. जाधव)
Professor of Practice, Assam down town University (AdtU), Guwahati, Assam.
( मानद डि. लीट. (D. Litt - Doctor of Letters - (Honoris Causa) Degree) ही पदवी प्राप्त )
M. Com., M Phil., MBA., DBM., DFM., DMM., DMM., LLB., FCA., ABMA., MBMA., Ph. D., D.Litt. (Honoris Causa)
सदस्य :- अभ्यास मंडळ (शैक्षणिक) ( 2020-21, 2022-23, 2024-25, 2025-26 )
: निमंत्रित सदस्य:- अभ्यास मंडळ ( शैक्षणिक) -2026-27. द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया न्यू दिल्ली
सदस्य:- असोसिएशन ऑफ युनिव्हरसीटीज एशिया अँड द पॅसीपीक - संशोधन आणि इनोव्हेशन कमिटी, थायलंड.
सदस्य:- असोसिएशन ऑफ युनिव्हरसीटीज एशिया अँड द पॅसीपीक - कॉलिटी अँशुरन्स कमिटी, थायलंड.
संस्थापक -सचिव -विश्वस्त. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड,ता:पुरंदर.जि-पुणे.
**विश्वस्त- सचिव**
पुरंदर ऑफिसर चारिटेबल फाउंडेशन पुणे.
माजी वित्त व लेखा अधिकारी व माजी प्रभारी कुलसचिव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
**विश्वस्त**
महाराष्ट्र गांधी स्मारक निधी कोथरूड, पुणे.
**अध्यक्ष**
संत भारती, पुणे.
**अध्यक्ष**
मातोश्री फाउंडेशन, पुणे.
संस्थापक -सचिव
वाघिरे महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ, सासवड, ता. पुरंदर, जिल्हा -पुणे. ४१२३०१.
**संस्थापक**
शिक्षण महर्षी डॉ. पतंगराव कदम विद्यालय दौंडज, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे, ४१२३०५
अध्यक्ष - कार्यकारी संचालक एम एस ग्लोबल एज्युकेशन सोल्युशनस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे.
:अध्यक्ष -कार्यकारी संचालक ट्यूटरगुरु इड्यूमॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, महाराष्ट्र, इंडिया.
कार्यालय : सरस्वती अपार्टमेंट ११७०/९ रेव्हीन्यू कॉलनी शिवाजी नगर पुणे: ४११००५.
Mob No :- +919822017818
Email ID :- ca_jadhavms@yahoo.com
Email ID :- camsjoffice@gmail.com
कायमचा पत्ता : "मातोश्री" मु+ पोस्ट: दौडज, तालुका + पुरंदर जिल्हा : पुणे. पीन कोड : ४१२३०५

मा. आमदार मोहनरावजी कदम साहेब त्याचप्रमाणे वहिनीसाहेब त्याचप्रमाणे इतर घरातील सर्व मान्यवर, नवीन युवा नेतृत्व डॉ. विश्वजीत कदम या सर्व व्यक्तींचा सहभाग लाभलेला आहे आणि त्यांच्या सहभागातून आणि त्यांच्या सहवासातून अनेक नवीन नेतृत्व उदयास येत आहे वाढत आहे आणि त्या दृष्टिकोनातून या सगळ्या बाबींचा विचार करता केलेलं काम, केलेले योगदान हे कौतुकास्पद आहे.

डॉक्टर शिवाजीराव कदम सर यांचा कुटुंब उत्सव स्वभाव नेहमी सर्वांना भावतो कारण एकत्र कुटुंबात नातेसंबंध कशाप्रमाणे जपायचे असतात हे सरांच्याकडून प्रत्येकाने शिकण्यासारखे आहे. एकत्र कुटुंबातील सर्व बंधूंच्या मुलाची चौकशी करण्यात, मदत करण्यास सर नेहमीच पुढाकार घेतात अनेक प्रकारची कार्य पूर्ण करत असताना सर कोणत्याही कार्याचे श्रेय स्वतःकडे घेत नाहीत ते नेहमीच म्हणतात मी जे घडलो त्यामध्ये माझ्या आई-वडिलांचे योग्य संस्कार व त्यांना त्यांचे सदैव मिळणाऱ्या आशीर्वादामुळेच असा आत्मविश्वास लोकांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करून प्रभावी लोकशक्ती निर्माण करण्याची जादू ज्यांच्याकडे आहे केवळ शैक्षणिक क्षेत्रात नव्हे तर शहरी ग्रामीण भागात, सरकारी कार्यालय, विविध संस्था, राज्यातील व देशातील विविध ठिकाणी तसेच परदेशातही डॉक्टर शिवाजीराव कदम सर यांचे अनेक चाहते आहेत .

डॉक्टर शिवाजीराव कदम सर हे प्रेमळ अजातशत्रू आणि दिलखुलास मोहक व्यक्तिमत्व व्यक्तिमत्व डॉक्टर कदम सर म्हणजे हिमालयात उगम पावणाऱ्या गंगोत्री सारखे निर्मळ मनाचे व्यक्तिमत्व. सतत आनंद आणि आश्वासक प्रेमळ रुबाबदार व्यक्ती. माणसातले माणूस, माणूस म्हणून अत्यंत श्रेष्ठ, माणुसकी जपणारे, त्यामुळे सहाजिकच त्यांचे सर्व क्षेत्रात शेकडो मित्र. सर्वच मित्र सत्वशील. त्यांचे अनेक साहित्यिकही मित्र होते व आहेतही. कवीवर्य मंगेश पाडगावकर, द. मा. मिराजदार, डॉ आनंद यादव, शास्त्रज्ञ व लेखक जयंत नारळीकर, कवी ना धो महानोर, डॉक्टर जयसिंगराव पवार, डॉक्टर दिनकरराव पाटील, डॉक्टर विश्वासराव पाटील, श्याम कुरळे, डॉक्टर प्र. चि. शेजवळकर, प्राध्यापक के जे पवार, प्राध्यापक राम शेवाळकर, बाबा कदम, कुलगुरू डॉ शंकराव खरात, कुलगुरू प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्रा. कन्हैया कुंदप, प्राध्यापक वसंत केशव पाटील किती नावे लिहावीत हे सर्व डॉक्टर शिवाजीराव कदम सरांचे जिवलग स्नेही आहेत व होतेही,

आज उच्च शिक्षणामध्ये अनेक बदल होत आहेत. अनेक नवीन विद्यापीठे निर्माण होत आहेत. देशात परदेशी विद्यापीठे येण्यासाठी केंद्र सरकारने व महाराष्ट्र सरकारने कायदे केलेले आहेत. त्याप्रमाणे आपल्या भारती विद्यापीठाच्या ब्रीदवाक्यानुसार" गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन "घडवून आणण्यासाठी सदैव कार्यरत राहावे लागणार आहे. आज उच्च शिक्षणामध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामध्ये सर्वोत्तम विद्यापीठ म्हणून भारती विद्यापीठ अभिमात विश्वविद्यालयास लौकिक प्राप्त करून देण्याचे काम डॉक्टर पतंगरावजी कदम साहेब व माननीय डॉक्टर शिवाजीराव कदम सरांनी केलेले आहे. उत्तम पायाभूत सुविधा, गुणवत्ता प्रधान व अत्याधुनिक अध्यापन पद्धती, सर्वोत्तम विविध सेवा सुविधा आणि सर्वांबरोबर विविध क्षेत्रात संशोधन करून जास्तीत जास्त पेटंट कसे रजिस्टर करता येईल या सर्व गोष्टींचा विचार डॉ कदम सर सातत्याने करीत असतात. सरांनी शिक्षण क्षेत्रात मोठे कार्य केलेले आहे. आज भारती विद्यापीठ लोकल स्तरापासून ग्लोबल स्तरापर्यंत कार्य करत आहे भारती विद्यापीठाच्या माध्यमातून कै. माननीय डॉक्टर पतंगरावजी कदम साहेब व डॉक्टर शिवाजीराव कदम यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या योगदानाचा विचार केल्याशिवाय महाराष्ट्राचा शैक्षणिक इतिहास पूर्ण होणार नाही अशी माझी धारणा आहे सतत नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेणे हे सरांचे विशेष कौशल व वैशिष्ट्य आहे त्यामुळे सर सतत आपल्या कार्यात रममान होत असतात समाजाच्या भल्यासाठी रंजलेल्या, गांजलेल्या पददलीत, ज्याला समाजात कुठे कोणतीही पत नाही त्यांना हातभार लावायचा आहे. त्यांचे जीवन सुखी करावयाचे आहे. हे सरांचे कार्य सातत्याने व अखंड चालणार आहे. म्हणूनच रॉबर्ट फॉस्टन एके ठिकाणी म्हणतात

Words are lovely dark and deep
But i have promise to keep
Miles to go before I Sleep

लोकांच्या परिसस्पर्शाने ज्यांचे जीवन उजळून निघाले आहे. हया परिसस्पर्शाने स्वतःचे प्रकाशमय झालेले जीवन इतरांनाही उपयुक्त व्हावे, समाजासाठी ते कारणी लागावे, या हेतूने त्यांनी अनेक शैक्षणिक संस्थांची निर्मिती केली मला नेहमीच वाटेत आले आहे की संस्था केवळ चुना विटा यांच्यामार्फत इमारती उभारून होत नाहीत तर माणसाच्या कर्तुत्वामुळे आणि आत्मीयतेमुळे त्या उभ्या राहतात अशा कर्तुत्ववान आणि आत्मीय व्यक्तींपैकी एक प्रोफेसर डॉक्टर शिवाजीराव कदम सर हे होत .

डॉक्टर कदम सरांचे अध्यापनाचे कौशल्य, छात्राबद्दलचे वात्सल्य आणि वातावरणातील मांगल्य असा त्रिवेणी संगम त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये आणि गुरूतुल्यामध्ये दिसून येतो. आपले व्यक्तिमत्व हे अनेक पदव्या मिळूनही पदाची अपेक्षा नाही, अधिकार असूनही अहंकार नाही, सिद्धीच्या प्रयत्नात प्रसिद्धीची हाव नाही असे व्यक्तिमत्व म्हणजे डॉक्टर शिवाजीराव कदम सर हे आहेत जीवेत शरदः शतम । या शब्दात त्यांना मी शुभेच्छा देतो.


या वाढदिवसानिमित्त कुलपती डॉक्टर शिवाजीराव कदम सर यांना पुढील कार्यकीर्दीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा ! नव्या उमेदीने, नवी स्वप्ने घेऊन अध्यात्म आधुनिक भारताचे स्वप्न साकार करण्याचे कार्य आपल्या हातून अविरतपणे घडत राहो ही सदिच्छा!

•••

## भारती विद्यापीठ, पुणे
## भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे

**मध्यवर्ती कार्यालय :** भारती विद्यापीठ भवन, एल.बी.एस. मार्ग, पुणे-३०. फोन : ०२०-२४४०७१०० फॅक्स : ०२०-२४३३९१२१
**Website : www.bharatividyapeeth.edu**

महाराष्ट्रातील कृतिशील विचारवंत, द्रष्ट्या समाजसुधारक नेत्यांच्या कार्यातून व विचारातून प्रेरणा घेऊन मा.डॉ. पतंगराव कदम यांनी वयाच्या १९व्या वर्षी १० मे १९६४ रोजी **'गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन'** हे संस्थेचे ध्येयवाक्य निश्चित करून भारती विद्यापीठाची स्थापना केली. भारती विद्यापीठाच्या १६० घटक संस्था या मा. डॉ. पतंगराव कदम यांची दूरदृष्टी आणि सामाजिक बांधिलकीचा आविष्कार आहेत.



**डॉ. पतंगराव कदम**
मा. राज्यमंत्री, संस्थापक, भारती विद्यापीठ

### भारती विद्यापीठ
- पूर्व प्राथमिक ते पीएच्.डी. पर्यंतचे शिक्षण देणाऱ्या १६० घटक संस्था
- ७ शहरातील शैक्षणिक संकुले
- आदिवासी, ग्रामीण व शहरी भागात ८५ गुणवत्ता धारक शाळा
- ४७ देशांतील ८०० हून अधिक परदेशी विद्यार्थी
- १० लाखांहून अधिक माजी विद्यार्थी

### भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय) (२९ घटक संस्था)
- राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद यांच्याकडून मूल्यांकनात 'अ+' दर्जा (२०१७) प्राप्त
- विश्वविद्यालय अनुदान आयोग प्रदानित श्रेणी-१ विश्वविद्यालय
- भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास विभागाकडून 'अ' दर्जा प्राप्त
- विविध राष्ट्रीय सर्वेक्षणांमध्ये उच्च मूल्यांकन
- जागतिक दर्जाचे संशोधन व असंख्य पेटंटस्

**उच्च शिक्षण विद्या शाखा**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वैद्यकीय | दंतचिकित्सा | आयुर्वेद | होमिओपॅथी | नर्सिंग |
| नेत्रविद्या | श्रवण शास्त्र | अभियांत्रिकी | विधी | वास्तुरचनाशास्त्र |
| औषधनिर्माणशास्त्र | समाजकार्य | जैविक तंत्रज्ञान | कृषी | दृश्य कला |
| शारीरिक शिक्षण | हॉटेल व्यवस्थापन | छायाचित्रकला | व्यवस्थापन | कला |
| वाणिज्य | विज्ञान | पर्यावरणशास्त्र | सामाजिकशास्त्रे | तंत्रविद्या निकेतन |

**ना.डॉ. विश्वजीत पतंगराव कदम**
कार्यवाह, भारती विद्यापीठ, प्र-कुलगुरू, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय
सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**शैक्षणिक परिसर**



## थोडक्यात पण महत्वाचे...


### ज्ञानसागर गुरुकुलच्या कन्येची भारतीय महिला क्रिकेट संघात निवड



■ श्रीलंका दौऱ्यासाठी संधी

बारामती (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील ज्ञानसागर गुरुकुल या शाळेतील विद्यार्थिनी व सावळ गावची कन्या कु. जान्हवी जीवन वीरकर हिची भारतीय महिला अंडर-19 क्रिकेट संघात श्रीलंका दौऱ्यासाठी निवड झाली असून, या ऐतिहासिक कामगिरीमुळे बारामतीच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची नवी भर पडली आहे. बारामतीच्या इतिहासात प्रथमच सावळ गावातील एका मुलीची भारतीय महिला अंडर-19 संघात निवड झाली आहे. जान्हवीने सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण बारामती तालुका, सावळ गाव आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जान्हवी ही ज्ञानसागर गुरुकुल, सावळ येथील विद्यार्थिनी असून, इयत्ता पाचवीपासून विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत तिने भारतीय संघापर्यंत मजल मारली आहे. तिच्या यशामागे तिचे वडील, प्रशिक्षक आणि कुटुंबीयांचे मोलाचे योगदान असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या निवडीबद्दल जान्हवी वीरकर हिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी श्रीलंका दौऱ्यात ती दमदार कामगिरी करून देशाचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. "बारामतीच्या लेकीची भारताच्या जर्सीपर्यंत झेप" ही केवळ वैयक्तिक यशोगाथा नसून ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरेल. महासागर गुरुकुल चे संस्थापक अध्यक्ष प्रा.सागर मानसिंग आटोळे यांनी संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

### पिंपरे खुर्द येथे आढळाला अनोळखी वृद्धाचा मृतदेह; नातेवाईकांचा शोध सुरु



नीरा (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील पिंपरे खुर्द गावाच्या हद्दीत सोमेश्वर टायर अँड वॉशिंग सेंटरसमोरील पानटपरीजवळ वडाच्या झाडाखाली एका अनोळखी वृद्ध पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध सुरू आहे. जेजुरी पोलीस ठाण्याच्या अकस्मात मयत रजिस्टर क्रमांक 65/2026 नुसार, हा अनोळखी पुरुषाचा मृतदेह शुक्रवार (दि. 12 जून) रोजी सकाळी सुमारे 11.32 वाजण्याच्या सुमारास आढळून आला. मृत व्यक्तीचे वय अंदाजे 60 ते 65 वर्षे असून त्याचा रंग निमगोरा, केस पांढरे, चेहरा उभट व उंची सुमारे 5 फूट 2 इंच आहे. मृत व्यक्तीच्या अंगात निळ्या रंगाचा पांढऱ्या रेघांचा फुलबाह्यांचा शर्ट व चॉकलेटी रंगाची पँट होती. मात्र त्याच्याकडे कोणतीही ओळख पटविणारी कागदपत्रे अथवा माहिती मिळून आलेली नाही. सदर व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी जेजुरी पोलीस प्रयत्नशील असून, या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास किंवा नातेवाईकांचा पत्ता माहित असल्यास त्यांनी तातडीने जेजुरी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### चौफुला रेणुका कला केंद्रात गोळीबार

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुक्यात बोरीपारधी येथील पुणे सोलापूर राष्ट्रीय मार्गा चौफुला रेणुका कला केंद्र या ठिकाणी शुक्रवार दिनांक 12 जून रोजी संध्याकाळी साडेसहा वाजता दोन्ही गटाच्या वादातून गावठी पिस्तूलचा गोळीबार करुन सराईत गुन्हेगारांनी दहशत माजवली सदर या घटनेची केडगाव पोलीस स्टेशन येथे फिर्यादी सोमनाथ माने यांनी लेखी तक्रार दिली आहे. गोळीबार करणारे आरोपी पवन बर्मा व मयुर पाटील व इतर त्यांचे साथीदार मु.पो. उरुळी तालुका हवेली जिल्हा पुणे दोन्ही गटांमध्ये शाब्दिक वाद होऊन सदर ही घटना घडली आहे.

### चौकशीची जाहीर नोटीस

बदल अर्ज क्र. २१९२/२०२४
न्यासाचे नाव : "सांस्कृतिक कला अॅकॅडमी"
नोंदणी क्र. : एफ-४७४३०/पुणे
अर्जदाराचे नाव : सौ, धनश्री संतोष कुलकर्णी

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-२, पुणे विभाग, पुणे हे नमूद केलेल्या बदल अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत:-

जुने नाव : "सांस्कृतिक कला अॅकॅडमी"
नवीन नाव : "अनाहत कल्चरल फाऊंडेशन"

सदर चौकशी प्रकरणी कोणास काही हरकत घ्यावयाची असेल, अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत या कार्यालयाच्या वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही आसे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाच्या निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझ्या सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-२. पुणे विभाग, पुणे यांच्या शिक्यानिशी आज दि. ११/०५/२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे

विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चर, बारामती येथे राज्यभरातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या

# कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

बारामती (दै. संध्या)



विद्या प्रतिष्ठानच्या स्कूल ऑफ आर्किटेक्चर (VPSOA), बारामती यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, (MSFDA), पुणे यांच्या सहकार्याने "शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी प्रशासकीय प्रशिक्षण" या विषयावरील दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन दि. १० व ११ जून २०२६ रोजी विद्यानगरी, बारामती येथील विद्या प्रतिष्ठानचे इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी सभागृहात करण्यात आले. "संस्थात्मक विकासासाठी प्रशासकीय उत्कृष्टतेचे सक्षमीकरण" या संकल्पनेवर आधारित या प्रशिक्षण कार्यक्रमाला राज्यातील विविध उच्च शिक्षण संस्थांमधील प्रशासकीय व ग्रंथालय कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पुणे, इंदापूर, फलटण, बारामती, दौंड तसेच इतर भागांतील कर्मचारी प्रशिक्षणात सहभागी झाले. त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी कौशल्यविकास आणि व्यावसायिक प्रशिक्षणाची वाढती गरज अधोरेखित झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, केंद्र प्रमुख श्री. शामकांत दौंडकर, सिम्बायोसिस कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्सचे माजी प्राचार्य डॉ. हृषिकेश सोमण तसेच विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या प्राचार्या राजश्री पाटील उपस्थित होत्या. स्वागतपर भाषणात प्रा. राजश्री पाटील यांनी शैक्षणिक संस्थांच्या कार्यक्षम व सुरळीत व्यवस्थापनामध्ये प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या अनुषंगाने बदलणाऱ्या शैक्षणिक गरजांची पूर्तता करण्यासाठी सातत्यपूर्ण कौशल्यविकास व व्यावसायिक प्रगती आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. दोन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमात टीमवर्क, कार्यस्थळावरील नैतिकता व आचारसंहिता, NEP 2020 अंतर्गत प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भूमिका, कार्यालयीन कार्यपद्धती व कार्यप्रवाह व्यवस्थापन, डिजिटल कौशल्ये व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) जागरूकता, सेवा पुस्तिका व्यवस्थापन, मृत मालमत्ता नोंदवही व विल्हेवाट प्रक्रिया, उच्च शिक्षण संस्थांतील धोरणे व कायदेशीर अनुपालन, संवाद व मानवी कौशल्ये तसेच तणाव व्यवस्थापन व कार्यस्थळावरील मानसिक स्वास्थ्य या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. हृषिकेश सोमण, श्री. सौम्य रंजन पाणी, डॉ. संतोष शहापूरकर आणि डॉ. सतीश केरकळ यांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन करत प्रशासकीय कार्यक्षमता, संवादकौशल्य, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, संस्थात्मक व्यवस्थापन आणि व्यावसायिक विकास याबाबत प्रशिक्षण सत्रे घेतली.

समारोप सत्रात विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या शैक्षणिक प्रमुख डॉ. सीमंतिनी चाफळकर व सर्व मान्यवरांनी सहभागींचा गौरव केला व प्रमाणपत्र दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात विद्या प्रतिष्ठानचे व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, सर्व व्याख्याते, सहभागी यांचे मोलाचे योगदान होते. विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या प्राचार्यांनी उच्चशिक्षण क्षेत्रात गुणवत्ता वृद्धीसाठी शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाला प्राधान्य देत सातत्याने अशा प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्याची संस्थेची बांधिलकी व्यक्त केली.

## नीरा ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत जाहीर

नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील लोकसंख्येने मोठी असलेल्या नीरा - शिवतक्रार ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकी साठी आरक्षण सोडत शुक्रवारी(दि.१२) दुपारी तीन वाजता नीरा ग्रामपंचायतीच्या सभागृहात काढण्यात आली. या सोडतीकरिता विस्तार अधिकारी सुभाष ताठे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.

शुक्रवारी (दि. १२) झालेल्या आरक्षण सोडतीमध्ये चार जागा इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी राखीव असून त्यामध्ये दोन जागा महिला व दोन जागा सर्वसाधारण ओबीसी प्रवर्गाकरिता राखीव आहे. एक जागा अनुसुचित जमाती स्त्री प्रवर्गाकरिता राखीव आहे.दोन जागा अनुसुचित जाती प्रवर्गाकरिता राखीव असून त्यामध्ये एक जागा महिला प्रवर्गाकरिता व एक जागा पुरूष प्रवर्गाकरिता राखीव आहे. पाच जागा सर्व साधारण महिला प्रवर्गाकरिता राखीव आहे तर पाच जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी असल्याची माहिती विस्तार अधिकारी सुभाष ताठे यांनी दिली.

सतरा सदस्य संख्या असलेल्या नीरा ग्रामपंचायतीत सहा वॉर्डासाठी नऊ महिला व आठ पुरूषांची सदस्य संख्या असणार आहे. चक्राकार पद्धतीनुसार यावेळी वार्ड नंबर चार ची सदस्य संख्या दोन असणार आहे. यावेळी प्रशासक तेजश्री काकडे , राजेश काकडे, अनिल चव्हाण, अनंता शिंदे, तलाठी मयुर पाटोळे, ग्रामसेवक रमेश राऊत यांच्यासह ग्रामपंचायतीचे आजी माजी पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

### कसे असणार वार्ड नुसार आरक्षण

वार्ड नंबर 1 : इतर मागासवर्ग महिला,सर्वसाधारण महिला सर्वसाधारण. वार्ड नंबर 2 : सर्वसाधारण महिला दोन सर्वसाधारण. वार्ड नंबर 3 : अनुसूचित जाती,इतर मागासवर्ग,सर्वसाधारण महिला. वार्ड नंबर 4 : अनुसूचित जाती स्त्री,सर्वसाधारण वार्ड नंबर 5 : इतर मागासवर्ग,सर्वसाधारण महिला ,सर्वसाधारण. वार्ड नंबर 6 : अनुसूचित जाती स्त्री, इतर मागासवर्गीय,सर्वसाधारण

## नीरेतील प्राथमिक शाळेचे काम संथगतीने

नीरा (दै. संध्या)

■ ठेकेदारांच्या दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांचे हाल, पालकांमध्ये संताप

■ नव्या शाळेचे झाले खंडर



पुरंदर तालुक्यातील नीरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम गेल्या चार वर्षांपासून सुरू आहे. शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून आधुनिक शाळा उभारण्याचा संकल्प केला असला, तरी ठेकेदारांच्या मनमानी कारभारामुळे आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हे स्वप्न अद्याप अपूर्णच राहिले आहे. परिणामी, यंदाही विद्यार्थ्यांना नवीन इमारतीत शिक्षण घेता येणार की नाही, याबाबत पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

जुनी शाळा इमारत धोकादायक झाल्यानंतर पालकांच्या आंदोलनातून नवीन इमारतीचा मार्ग मोकळा झाला होता. शाळा क्रमांक १ आणि २ साठी भव्य दोन मजली इमारत उभारण्यात आली. मात्र विविध टप्प्यांतील कामे वेळेत पूर्ण न झाल्याने आजही ही इमारत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी तयार नाही.

सध्या शेकडो विद्यार्थ्यांना रयत शिक्षण संस्थेच्या संकुलातील तात्पुरत्या वर्गखोल्यांमध्ये शिक्षण घ्यावे लागत आहे.

दरम्यान, फरशी, शौचालये आणि इतर पूरक कामे अद्याप अपूर्ण असून कामाचा वेग अत्यंत संथ असल्याचे चित्र आहे. संबंधित ठेकेदाराने ३१ मेपर्यंत सर्व काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र मुदत उलटून पंधरा दिवसांहून अधिक काळ लोटल्यानंतरही उर्वरित कामात अपेक्षित प्रगती झालेली नाही.

एकेकाळी सुमारे ८०० विद्यार्थ्यांची पटसंख्या असलेली ही शाळा आज पटसंख्या घटण्याच्या समस्येला सामोरी जात आहे. नवीन इमारतीमुळे शाळेला नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा पालक आणि ग्रामस्थांनी व्यक्त केली होती.

परंतु रखडलेल्या कामामुळे त्या अपेक्षांवर पाणी फिरल्याची भावना व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणात राडारोडा पडून असल्याने परिसराचे विद्रूपीकरण झाले आहे.

कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेली इमारत आजही अपूर्ण अवस्थेत उभी असल्याने नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर असताना संबंधित यंत्रणा आणि ठेकेदार यांच्याकडून आवश्यक ती तत्परता दिसून येत नसल्याची टीका होत आहे.

दरम्यान, नीरा ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजेश काकडे यांनी चार वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रतीक्षेचा शेवट आता तरी होणार का, आणि नीरेतील विद्यार्थ्यांना आधुनिक व सुरक्षित शाळेचा लाभ मिळणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

"उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. १ जुलैपासून नवीन इमारतीत शाळा सुरू करण्याचे नियोजन आहे. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत शाळेची निवड झाली असून कंपाउंड वॉलसाठी २८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे, शाळेचे एक आदर्श मॉडेल आपल्याला पाहायला मिळणार आहे."

## विषारी औषध प्राशन करून युवकाची आत्महत्या

नीरा (दै. संध्या)

■ उपचारादरम्यान मृत्यू

■ नीरा येथील घटना

■ पुढील तपासासाठी प्रकरण जेजुरी पोलिसांकडे वर्ग



नीरा येथील एका युवकाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

लोणंद पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संपत दिलीप धायगुडे (रा. नीरा) वय ३२ वर्ष यांनी अज्ञात कारणातून विषारी औषध प्राशन केले होते. त्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना उपचारासाठी लोणंद येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला.

घटना नीरा (ता. पुरंदर) येथे घडली असून उपचारासाठी संबंधित युवकास लोणंद (ता. खंडाळा) येथे नेण्यात आले होते. मृत्यूची नोंद लोणंद पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद दाखल करण्यात आली असून पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी प्रकरण जेजुरी पोलिस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे. याप्रकरणी अधिक तपास जेजुरी पोलीस करीत आहेत.

## अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिभावात सांगता

आळंदी (दै. संध्या)




आळंदी येथील स्वकुळसाळी ज्ञातीगृहात अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या श्री शिवमहापुराण कथा आणि अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप भक्तिमय वातावरणात पार पडला. सप्ताहाची सांगता ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली असल्याची माहिती अध्यक्ष अमित उगले व उपाध्यक्ष मनोहर दिवाणे यांनी सांगितले. १ जून ते ८ जून या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक सोहळ्यात दररोज विविध आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे काकडा आरतीने दिवसाची सुरुवात होत असून त्यानंतर विष्णूसहस्रनाम पठण, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम गाथा भजन, श्री शिवमहापुराण कथा आणि हरिकीर्तन यांचे आयोजन करण्यात आले. रात्री सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. सप्ताहातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या शिवमहापुराण कथेचे निरूपण भागवताचार्य सोनाली दीदीजी महाजन यांनी सात दिवस केले. त्यांच्या ओघवत्या व रसाळ शैलीतील कथेमुळे दररोज सभागृह भाविकांनी फुलून जात होते. तसेच सायंकाळच्या हरिकीर्तन सेवेत विविध कीर्तनकारांनी सहभाग घेत भक्तांना अध्यात्मिक विचारांचे मार्गदर्शन केले. समारोपाच्या दिवशी सकाळी आळंदी शहरातून प्रभातफेरी व ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले. इंद्रायणी नदी परिसर व श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर परिसरातून निघालेली दिंडी स्वकुळसाळी ज्ञातीगृहात दाखल झाली.

# बारामतीत सचिन सातव नगराध्यक्षांच्या कारकिर्दीत नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा ७७ विषयांसाठी तब्बल ७ तास चालू

बारामती (दै. संध्या)




चर्चेत गाजत असलेली सर्वसाधारण सभा अखेर खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव यांनी प्रत्येक नगरसेवकांचे प्रश्न,मुद्दे,मागणी ऐकून त्याला व्यवस्थित हाताळून तब्बल 7 तासापेक्षा जास्त वेळ सभागृहात ही सभा पार पडली.बारामती नगर परिषदेच्या शरदचंद्रजी पवार सभागृहात नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष,गटनेता,विरोधी गट नेते,मुख्याधिकारी तसेच सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत सर्वसाधारण सभा पार पडली. सभेमध्ये नागरिकांशी संबंधित विविध विकासकामांसह एकूण 77 विषय सादर करण्यात आले. यापैकी 75 विषयांना मंजुरी देण्यात आली, तर दोन विषयांना नामंजुरी देण्यात आली.सभेच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याविषयी करण्यात आलेल्या वक्तव्याचा सभागृहात जाहीर निषेध करण्यात आला.त्यानंतर विविध लोकहिताच्या विषयांवर नगरसेवकांनी चर्चा करत महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या.संघमित्रा चौधरी यांनी अनुसूचित जाती-जमाती संदर्भातील विषय सभेपुढे मांडला. तांदुळवाडी येथील सायन्स पार्कच्या विषयास मंजुरी देताना जय पाटील व मनीषा चव्हाण यांनी भूमिका मांडली.गरुड बागेतील पार्किंग व्यवस्थेबाबत भारती शेळके यांनी प्रश्न उपस्थित केला. मालमत्ता करात दहा टक्के सवलत देण्याची मागणी जय पाटील,अमोल कावळे,संजय संघवी, निलेश इंगुले आणि आरती शेंडगे यांनी केली.नगरपरिषदेच्या गाळ्यांबाबत निलेश इंगुले यांनी प्रश्न उपस्थित केला,तर घरपट्टी कमीत कमी आकारण्यात यावी,अशी मागणी आरती शेंडगे यांनी केली.

शास्ती माफ करण्याचा मुद्दा विष्णुपंत चौधर,सविता जाधव,सुनील सस्ते,प्रसाद खारतोडे आणि संजय संघवी यांनी मांडला.शहरात सर्व महापुरुषांचे पुतळे उभारण्यात यावेत,अशी मागणी नवनाथ बल्लाळ,अश्विनी सातव, प्रतिभा खरात आणि बिरजू मांढरे यांनी केली.

वाढीव हद्दीतील रुई गावातील उघड्या गटारींचा प्रश्न ऐरणीवर तसेच रुई परिसरात स्मशानभूमी उभारण्याचा मुद्दाही सभेत चर्चिला गेला.रुई गावातील उघड्या गटारी पावसाळ्यामुळे तुडुंब भरून वाहत असून परिसरात दुर्गंधी पसरत असल्याची गंभीर बाब संपदा चौधर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली.यावर तातडीने उपाययोजना करण्यात यावी,तसेच रुई येथील डांबरीकरणाचा रस्ता त्वरित मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी केली. शहरातील ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करण्याचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला.वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नमो उद्यान उभारण्याचा प्रस्ताव आरती शेंडगे यांनी मांडला.तीन हत्ती चौकाला 'तिरंगा सर्कल' असे संबोधण्यात यावे.जळोची येथे भव्य गार्डन करण्यात यावे,टॉयलेटची फेरनिविदा काढावी,जळोची येथील श्रीराम नगर शाळेला 23 गुंठे बक्षीस पत्र दिल्यामुळे त्या शाळेला आजोबांचे नाव देण्यात यावे अशी मागणी अभिजीत जाधव यांनी केली.

मुस्लिम समाजासाठी बहुउद्देशीय सभागृह (शादीखाना) उभारण्याची मागणी आफरीन बागवान यांनी केली.शारदा प्रांगण येथील शाळा क्रमांक पाचची जुनी इमारत पाडून नवीन इमारत उभारण्याचा विषय अभिजीत चव्हाण व आरती शेंडगे यांनी मांडला.शहरातील विविध भागांत ओपन जिम उभारण्याची मागणी दर्शना तांबे,प्रतिभा खरात,मनीषा

बनकर,शर्मिला ढवाण,पुनम चव्हाण, गणेश जोजारे,अनुप्रिता डांगे,गोरख पारसे,अमोल कावळे आदींनी केली

महिलांसाठी हिरकणी कक्ष आणि अत्याधुनिक स्वच्छतागृहे उभारण्याची मागणी अनुप्रिता डांगे, दर्शना तांबे,गणेश जोजारे,सोमनाथ गजाकस,विशाल हिंगणे,मंगल जगताप,मंगला किर्वे, रूपाली मलगुंडे आणि वनिता सातकर यांनी केली.अंतर्गत रस्त्यांच्या कामांबाबत

राहुल वाघोलीकर यांनी प्रश्न उपस्थित केला.दलित वस्तीतील विकासकामांचा दर्जा निकृष्ट असल्याचा आरोप अभिजीत चव्हाण यांनी केला.तसेच प्रभागनिहाय सुरू

असलेल्या व प्रलंबित कामांचा आढावा घेण्याची मागणी अमर धुमाळ यांनी केली.बारामती शहरात स्वतंत्र हॉकर झोन उभारण्याचा मुद्दा

गणेश जोजारे व राहुल वाघोलीकर यांनी उपस्थित केला.गणेश भाजी मंडईतील गाळेधारकांच्या समस्यांबाबत दर्शना तांबे व अल्ताफ सय्यद यांनी मुद्दा मांडला.फिरते विक्रेते व पथविक्रेते यांच्याकडून होणाऱ्या दैनिक वसुलीबाबत अमर धुमाळ यांनी सभेचे लक्ष वेधले.बुद्ध

विहार तसेच विविध महापुरुषांच्या जयंती साजऱ्या होणाऱ्या ठिकाणांचे सुशोभीकरण करण्याची मागणी अविनाश निकाळजे यांनी केली.माळेगाव कॉलनी शाळेची बस व परिचारिका बारामती नगर परिषदेकडे वर्ग करून त्यांना नगरपरिषदेकडून मानधन देण्याची मागणी राजेंद्र नाना सोनवणे यांनी केली.विविध विकासकामे,कर सवलती आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा करत सभेतील बहुतांश विषयांना मंजुरी देण्यात आली.शहराच्या विकासास गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट झाले.या वेळी झालेली सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

या दरम्यान नगरसेवक किशोर मासाळ यांनी धनगरी पेहराव परिधान करून फेटा,घोंगडी,धोतर घालून कपाळावर भंडारा लावून हातात संविधान व काठी घेऊन नगरपरिषद मध्ये आल्याने अनेकांचे लक्ष वेधले गेले.

# मुंढेंच्या धडाक्यालाही पुरंदरचा मावा पुरून उरला

## एफडीएच्या नाकावर टिच्चून २४ तास सुरू अवैध विक्री

नीरा (दै. संध्या)

राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अवैध गुटखा, मावा आणि तंबाखूजन्य पदार्थांविरोधात धडक कारवायांचे सत्र सुरू केले असताना पुरंदर तालुका मात्र या मोहिमेला जणू अपवाद ठरत असल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये मावा आणि गुटखा विक्रेत्यांनी धसका घेतला असताना सासवड, जेजुरी, नीरा यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये मावा आजही राजरोसपणे, बिनधास्तपणे आणि दिवस-रात्र उपलब्ध होत असल्याने पुणे जिल्हा प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या शहरातील रस्त्यांवर, चौकाचौकांत आणि बाजारपेठांमध्ये युवकांसह ज्येष्ठ नागरिकही माव्याच्या पिचकाऱ्या मारताना दिसतात. माव्याच्या पुड्या हवेत उडत असतात आणि सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण होत असते. कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराला निमंत्रण देणारा हा पदार्थ इतक्या मोठ्या प्रमाणात विकला जात असताना संबंधित यंत्रणा मात्र डोळ्यावर कातडे ओढून बसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

विशेष म्हणजे या माव्यामध्ये नेमके काय मिसळले जाते, याचा कोणताही शास्त्रीय अभ्यास किंवा तपास झालेला दिसत नाही. मध्यंतरी काही ठिकाणी माव्यामध्ये गांजाचे पाणी मिसळले जात असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. तंबाखूमध्ये लाकडी भुसा आणि इतर घातक घटक मिसळले जात असल्याच्याही चर्चा आहेत. या सर्व साहित्याचा पुरवठा आणि उत्पादन सासवड परिसरातील काही कारखान्यांतून होत असल्याचे बोलले जाते. मात्र या चर्चांची सत्यता तपासण्यासाठी प्रशासनाने कधी गंभीर प्रयत्न केल्याचे दिसून आलेले नाही.

मावा व्यवसायाचे आणखी एक गंभीर वास्तव म्हणजे बेरोजगार आणि अशिक्षित तरुणांना या व्यवसायाकडे आकर्षित केले जात असल्याची चर्चा. काही आर्थिक संस्थांकडून किंवा प्रभावशाली घटकांकडून "टपरी टाक, बाकी आम्ही पाहतो" अशा आश्वासनांद्वारे युवकांना या व्यवसायात उतरवले जात असल्याचा आरोप होत आहे. उत्पादन, आर्थिक पाठबळ, वितरण आणि राजकीय संरक्षण अशा साखळीत अडकलेले अनेक युवक पुढे विशिष्ट गटांचे कट्टर कार्यकर्ते बनत असल्याचेही बोलले जाते.

पुरंदर तालुक्यात कर्करोगाच्या रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याची चर्चा अनेक वर्षांपासून सुरू आहे. तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणाऱ्या कर्करोगावर उपचार उपलब्ध असले तरी रुग्ण आणि कुटुंबीयांना सहन करावा लागणारा मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास प्रचंड असतो. व्यसनामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या आयुष्यांची संख्या वाढत असताना प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृतीकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने गेल्या दहा ते पंधरा वर्षांत पुरंदर तालुक्यातील अवैध मावा आणि गुटखा विक्रेत्यांवर किती धाडी टाकल्या, किती परवाने तपासले, किती नमुने जप्त केले आणि किती गुन्हे दाखल केले याची माहिती जनतेसमोर क्वचितच आली आहे. अनेक विक्रेत्यांकडे आवश्यक परवाने आहेत की नाहीत, याचीही चौकशी झाल्याचे उदाहरण दुर्मिळ आहे. नगरपरिषद, ग्रामपंचायत आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अशा व्यवसायांना ना-हरकत प्रमाणपत्रे कशी दिली जातात, हा देखील मोठा प्रश्न आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची जबाबदारी प्रशासनाची असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

मावा विक्रीतून कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याच्या चर्चा तालुक्यात नेहमीच रंगतात. याच व्यवसायातून आर्थिक ताकद मिळवून काही विक्रेते स्थानिक राजकारणात सक्रिय झाले असून काहींनी नगरसेवक, ग्रामपंचायत सदस्य यांसारखी पदेही गाठल्याचे उदाहरणे आहेत. त्यामुळे समाजात चुकीचा संदेश जात असून युवकांसमोर आदर्श म्हणून नेमके कोण उभे राहत आहेत, हा चिंतेचा विषय बनला आहे.

आज राज्यभरात तुकाराम मुंढे अवैध तंबाखूजन्य पदार्थांविरोधात मोहीम उघडत असताना पुरंदर तालुका मात्र "मावेवाल्यांसाठी सुरक्षित आश्रयस्थान" ठरत असल्याची उपरोधिक चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. ही चर्चा चुकीची ठरवायची असेल तर संबंधित यंत्रणांनी केवळ कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्ष मैदानात उतरून कठोर कारवाई करण्याची वेळ आता आली आहे. अन्यथा माव्याच्या पिचकाऱ्यांबरोबरच प्रशासनाच्या निष्क्रियतेवरही जनतेचा रोष उडत राहणार, हे निश्चित.

### माव्याचे मोठे आर्थिक गणित

पुरंदर तालुक्यातील नीरा येथे देखील मोठ्या प्रमाणात मावा बनवला जातो व विकला जातो. एका मावा विक्रेत्याने नावं न छापण्याच्या अटीवर दिलेल्या माहिती नुसार मावा विक्रीसाठी प्याकिंग करण्यासाठीची प्लास्टिकची छोटी पिशवी 25 किलो एकट्या नीरा शहारासाठी लागते. म्हणजेच 20 रुपये किंमतीच्या किमान 10 हजार माव्याच्या पिशव्या विकल्या जातात. म्हणजेच दोन लाख रुपयाचा मावा एकट्या नीरा शहरातील विकला जातो. तर सासवड आणि जेजुरी शहरांत दररोज 10 लाख रुपया पेक्षा जास्त किंमतीचा मावा विकला जातो त्यामुळे महिन्याला कोट्यावधीची उलाढाल होत असते.

### अवैध गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री

नीरा शहरांत गुटक्याचीही मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. पान टपरीवर सर्रास पणे विक्री होत असुन प्रशासन मात्र यावर कोणतीही कारवाई करत नाही. नीरा शहरांत तीन व्यापारी किराणा मलाच्या दुकानात गुटक्याची होलसेल दारात विक्री करतात. त्यांच्या गोडाऊन मध्ये लाखो रुपयाचा साठा केलेला असतो.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्षपदी ॲड. दीपक पटवर्धन



पुणे (दैनिक संध्या) : संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांची शिखर संस्था असलेल्या राज्य पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी रत्नागिरी येथील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांची आज बिनविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मिलिंद टांकसाळे (उपनिबंधक, पुणे शहर १) यांनी कामकाज पाहिले. यावेळी सहकार भारतीचे संस्थापक सदस्य आणि रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे उपस्थित होते. ते म्हणाले की, युद्धजन्य परिस्थिती, इंधनाचे वाढते दर यामुळे अर्थविश्वासमोर एक आव्हानात्मक परिस्थिती उद्भवली आहे. यामुळे पतसंस्थांसमोर देखील नवीन आव्हाने उभी राहत आहेत, अशा परिस्थितीत राज्यभरातील सुमारे १९ हजार पतसंस्थांना सक्षम नेतृत्व मिळाले आहे. यावेळी पतसंस्था फेडरेशनचे संस्थापक संचालक वसंत शिंदे, माजी अध्यक्ष ओमप्रकाश तथा काका कोयटे, उपाध्यक्ष डॉ. शांतीलाल सिंगी, महासचिव शशिकांत राजोबा आणि सर्व संचालक सदस्य उपस्थित होते. राज्य पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी ॲड. पटवर्धन यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार किरण सामंत, मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष व आमदार प्रवीण दरेकर, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, आमदार प्रसाद लाड आदींनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### सासवडमधून वेल्डर बेपत्ता; पत्नीची पोलिसांत तक्रार



नीरा (दैनिक संध्या) : सासवड येथील हिवरकर मळा परिसरातील दत्तगुरु फेब्रिकेशन येथे वेल्डर म्हणून काम करणारे सदानंद सुरचंद जगताप हे 14 मे 2026 पासून बेपत्ता झाले आहेत. कामाच्या ठिकाणावरून ते अचानक गायब झाल्याने कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. याप्रकरणी त्यांची पत्नी सिंधू सूरचंद जगताप यांनी सासवड पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी तक्रारीची नोंद घेऊन सदानंद जगताप यांचा शोध सुरू केला असून नागरिकांना त्यांच्याबाबत माहिती असल्यास सासवड पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### बालमजुरी निर्मूलनाचा जागतिक संदेश

नारायणगाव (दैनिक संध्या) : श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माळवाडी (बोटा) येथे जागतिक बालमजुरीविरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाचे आयोजन इव्हेंट मॅनेजमेंट कमिटी तर्फे करण्यात आले. बालकांचे शोषण थांबवणे, त्यांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणे आणि बालमजुरीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी समाजात जनजागृती करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. शिक्षण, खेळ आणि आनंददायी बालपण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार आहे.

## जुन्नर तालुक्यातील विविध गावांमध्ये "खेत बचाओ अभियान" उत्साहात संपन्न

जुन्नर (दै. संध्या)




भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या वतीने राबविण्यात येणारे "खेत बचाओ अभियान" जुन्नर तालुक्यातील विविध गावांमध्ये उत्साहात संपन्न झाले. या अभियानांतर्गत गोळेगाव, अलदरे, पिंपळगाव सिद्धनाथ, आगर, कुसूर, वडज, चिंचोली, पारुंडे आणि वैष्णवधाम या गावांमध्ये शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी फोरकास्ट ॲग्रोटेक इनोव्हेशन्स प्रा. लि. आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे यांनीही सहकार्य केले.

देशभरात १ जून ते ३० जून या कालावधीत सुरू असलेल्या या अभियानांतर्गत केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अधिपत्याखालील भारतीय कृषी अनुसंधान परिषद – केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था, माटुंगा (मुंबई) येथे कार्यरत असलेले प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अशोककुमार भारीमल, प्रधान शास्त्रज्ञ डॉ. कनिका शर्मा, तांत्रिक अधिकारी शरदराव कोकणे, मुख्य तांत्रिक अधिकारी सौ. प्राची म्हात्रे, फोरकास्ट ॲग्रोटेक चे संचालक डॉ . संतोष सहाणे , कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव चे मृदा शास्त्रज्ञ योगेश यादव ,कृषिभूषण श्रीराम गाढवे, कृषिभूषण जितेंद्र बिडवई, कृषी अधिकारी बापूसाहेब रोकडे आणि कृषी सहायक अमोल मोरे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. अशोककुमार भारीमल यांनी जमिनीचे आरोग्य, नैसर्गिक शेतीचे आर्थिक व आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व, शेतकऱ्यांनी पूरक व्यवसाय उभारताना केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारे अर्थसहाय्य तसेच पीक नियोजन याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. कनिका शर्मा यांनी माती परीक्षणाचे महत्त्व आणि रासायनिक खतांचा कमी वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. तर डॉ. संतोष सहाणे यांनी जैविक खते स्वतःच्या शेतात कशी तयार करावीत तसेच बायोगॅस निर्मितीबाबत माहिती दिली.

तसेच शरदराव कोकणे यांनी जीवामृत, घनजीवामृत आणि जैविक कीटकनाशकांची निर्मिती व वापर याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांच्या नैसर्गिक शेतीशी संबंधित अडचणी व समस्याही जाणून घेत त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान गावातील सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी उपस्थित तज्ज्ञांचा सन्मान केला. यावेळी सरपंच मयूर पवार, माजी सरपंच सुरेश गायकवाड, उत्तम काशीद, दत्तात्रय ताजने, राजेंद्र भगत, तान्हाजी दुराफे, सदाशिव ताजने, कृषिमित्र प्रवीण गाडेकर, दीपक कोकणे, अशोक वऱ्हाडी, जयवंत डोके, रमेश मेहेर, दीपक सरजीने, सत्यवान खंडागळे, गणेश मेहेर आदी मान्यवरांसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एफ. बी. आतार यांनी केले, तर माजी उपसरपंच भरत जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## धोलवडच्या लोकअदालतीत नागरिकांचा उत्साहपूर्ण सहभाग

नारायणगाव (दै. संध्या)

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या सौजन्याने आणि तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या वतीने जिल्हा व अति-सत्र न्यायालय जुन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली धोलवड येथे आयोजित 'फिरते लोक अदालत' शिबिराला स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेनुसार फिरत्या लोक न्यायालयाच्या माध्यमातून लोकांच्या प्रलंबित खटल्यांचा, महसूल वादांचा आणि इतर समस्यांचा तडजोडीने आणि जलद निपटारा करण्यात आला.

आयोजित विधी जनजागृती शिबिरामध्ये विविध कायदेविषयक विषयांवर उपस्थित विधीज्ञानी ग्रामस्थांना सोप्या भाषेत कायदेशीर मार्गदर्शन केले.या शिबिरामुळे नागरिकांना गावातच जलद आणि सुलभ न्याय मिळाल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी जिल्हा व अति-सत्र न्यायाधीश एस.बी. शेलार यांनी पक्षकारांना आव्हान केले की, तालुका विधी सेवा समिती जुन्नर न्याय आपल्या दारी या संकल्पनेनुसार थेट आपल्यापर्यंत पोहोचली आहे. पक्षकारांनी या मोबाईल व्हॅन लोकअदालतीचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपली प्रलंबित प्रकरणे समान सामोपचाराने निकाली काढावीत, जेणेकरून आयुष्यातील महत्त्वाचा वेळ आणि पैसा वाचेल.

दिवसभराच्या कामकाजात लोक न्यायालयाच्या पॅनेलने दोन्ही बाजूंच्या पक्षकारांचे म्हणणे अत्यंत शांतपणे ऐकून घेतले आणि त्यांच्यात समेट घडवून आणला. एकूण 2 दिवाणी दावे आपसी समझोता आणि तडजोडीने यशस्वीरित्या निकाली काढण्यात आले.

## अल्प उत्पन्न गटातील महिलांना व्यवसाय किटचे वितरण

पिंपरी (दै. संध्या)



अल्प उत्पन्न गटातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी जॉन्सन कंट्रोल्स इंडियाने सीएसआर उपक्रमांतर्गत पर्णकुटी सामाजिक संस्थेच्या सहकार्याने महिलांना व्यवसाय किटचे वाटप करण्यात आले. त्यामुळे या महिलांची शाश्वत उपजीविका मजबूत होण्यास मदत होणार आहे.

पर्णकुटी सामाजिक संस्थेत झालेल्या कार्यक्रमात आठ ब्युटी पार्लर युनिट्स, आठ शिवणकाम युनिट्स आणि दहा क्रोशे युनिट्सचा समावेश होता. यावेळी जॉन्सन कंट्रोल्स इंडियाच्या प्रीती वैष्णव, संचारी सिन्हा, पर्णकुटी संस्थेच्या संस्थापक स्नेहा भारती उपस्थित होते.

या मदतीमुळे महिलांना शाश्वत उत्पन्न निर्माण करण्यास आणि व्यवसाय उभारण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाचा अप्रत्यक्षपणे शंभरहून जास्त महिलांना लाभ होणार आहे. कुटुंबाची उपजीविका, पोषण आणि मुलांच्या शिक्षणासाठी याचा फायदा होईल.

प्रीती वैष्णव म्हणाल्या, कौशल्य विकासासोबत बाजारपेठेतील संधी आणि उद्योजकता मदत दिल्यास महिलांचे सक्षमीकरण होऊन कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होते. पर्णकुटीच्या सहकार्याने आम्ही समाजाच्या सर्वसमावेशक विकास आर्थिक उन्नतीसाठी कार्य करत आहोत, ज्यामुळे महिलांना आत्मनिर्भर उद्योजक बनण्याची आणि स्थानिक अर्थव्यवस्थेत योगदान देण्याची संधी मिळत आहे.

पर्णकुटीच्या संस्थापिका व सचिव स्नेहा भारती म्हणाल्या, महिलांना प्रशिक्षणापासून यशस्वी उद्योजकतेपर्यंत पोहोचविण्याचा मार्ग तयार होत आहे. तसेच बाजारपेठेतील संधी, मार्गदर्शन आणि सहकार्याच्या नेटवर्कद्वारे स्थानिक पातळीवर उपजीविकेचे सक्षम वातावरण निर्माण होत आहे. जॉन्सन कंट्रोल्ससारख्या बांधिलकी असलेल्या भागीदारांमुळे अनेक कुटुंबांना लाभ होत आहे.

पर्णकुटी संस्थेत यंदा ५५ महिलांनी प्रगत कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केले, ज्यामध्ये कापडी दागिने तयार करणे, क्रोशे तंत्र, प्रॉडक्ट फोटोग्राफी, सोशल मीडिया व मार्केटिंगसाठी प्रॉडक्ट डिझाईन, ग्राफिक्स यांचा समावेश होता. हे प्रशिक्षण उत्पादन गुणवत्ता, बाजारपेठेतील तयारी आणि रोजगारक्षमतेत वाढ करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. ज्यामुळे महिलांना विविध उत्पन्नाच्या संधी उपलब्ध होतील. या महिलांनी नुकतीच बारामती येथील कॉटनकिंग आणि कलावती इको-फ्रेंडली बॅग हाऊस या उत्पादन युनिट्सना भेट देऊन माहिती जाणून घेतली.

## वारकऱ्यांसाठी सर्वोत्तम सुविधा उपलब्ध कराव्यात

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठलाच्या आषाढी एकादशीसाठी आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराज आणि देहूवरून संत तुकाराम महाराज आणि सासवड येथील संत सोपानकाका संस्थानकडून पालखी सोहळ्याची मोठी परंपरा असून, याबरोबर राज्यातील इतर संताच्या पालखी सोहळा पुणे विभागात आल्यानंतर आज पर्यंतच्या परंपरेला साजेसा आणि वारकऱ्यांसाठी अधिक सुविधायुक्त सोहळा आयोजित करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. आषाढी पालखी सोहळा-२०२६ च्या नियोजनाबाबत झुंबर हॉल, पुणे विभागीय कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे, पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, विभागीय आयुक्त शितल तेली - उगले, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे शहरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालखी सोहळ्यांशी संबंधित प्रमुख विश्वस्त, पालखी प्रमुख, सातारा व सोलापूर जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा मानबिंदू आहे. दरवर्षी लाखो वारकरी पांडुरंगाच्या भेटीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या पार्श्वभूमीवर प्रत्येक वारकऱ्याला सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पालखी प्रमुखांनी बैठकीत मांडलेल्या सूचना आणि अडचणींची दखल घेऊन त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. पावसाळ्याच्या कालावधीत वारी होत असल्याने पालखी मार्गावरील रस्ते, मुक्कामस्थळे आणि विसावा स्थळांवर चिखल होणार नाही यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद तसेच संबंधित यंत्रणांनी तातडीने दुरुस्ती आणि मजबुतीकरणाची कामे पूर्ण करावीत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मार्गावरील अपूर्ण कामे पालखी सोहळ्यापूर्वी पूर्ण करावीत, असेही त्यांनी सांगितले. वारकऱ्यांसाठी स्वच्छ शौचालये, पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्य सुविधा, मदत केंद्रे आणि दिशादर्शक फलक यांची पुरेशी व्यवस्था करावी. निर्मल वारी अभियान प्रभावीपणे राबवून शौचालयांची नियमित स्वच्छता करावी. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे तसेच सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीनची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची नियमित तपासणी, अन्नपदार्थांतील भेसळ रोखणे आणि आरोग्यविषयक उपाययोजनांवर विशेष भर देण्याचे निर्देश देत श्रीमती पवार म्हणाल्या की, आपत्कालीन परिस्थितीसाठी आरोग्य विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवावी.

